# श्री साईलीला




लेंडीबागेत ध्यानमुद्रेत श्रीसाईबाबा



जुलै ] किं. ६० पैसे [ १९७९

# ॥ योगसिद्धी ॥

जुलै १९७९

❀ भगवान ❀

श्रीसाईबाबा विशेषांक

प्रसिद्ध झाला !

— सर्वत्र उपलब्ध —

संग्राह्य मुखपृष्ठ ● मूल्य चार रुपये

— संपर्क —

सदानंद प्रकाशन :
१२८६ सदाशिव, चिमण्या गणपतीजवळ,
पुणे ४११०३०

# श्री गुरुपौर्णिमा विशेषांक

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥



## श्रीसाई वाक्सुधा

दुग्धापोटीं आहे घृत ।
परी न करितां तें आम्लयुत ।
नाहीं तक्र ना नवनीत ।
तेंही अपेक्षित संस्कारा ॥ ८२ ॥

तक्र घुसळल्या विरहीत ।
प्राप्त होईना नवनीत ।
तेंही न करितां अग्निसंयुक्त ।
स्वादिष्ट घृत लाभेना ॥ ८३ ॥

पाहिजे संस्कार बलवत्तना ।
पूर्वाभ्यासें बुद्धिमत्ता ।
अभ्यासावीण न चित्तशुद्धता ।
तिजवीण दुर्गमता ज्ञानास ॥ ८४ ॥

व्हावी निर्मळ चित्तवृत्ति ।
तरीच होईल आत्मप्राप्ति ।
होता नये जों ती स्वरूपस्थिति ।
भगवद्भक्ति सोडूं नये ॥ ८५ ॥

शगे भगवद्भक्तीचा पाया ।
ंदिर आत्मज्ञानाचें उठाया ।
शरी मुक्तीचे कळस झळकाया ।
वजा फडकाया विरक्तीची ॥ ८६ ॥

—श्रीसाईसच्चरित—अध्याय ३७ वा

# श्रीसाईलीला


[ श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५८ वे ] जुलै १९७९ [ अं. ४



: संपादक :

श्री. क. हि. काकरे,

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )



वार्षिक वर्गणी रु. ६–०० (ट. ख. सह)

किरकोळ अंक ६० पैसे फक्त.



: कार्यालय :

"साईनिकेतन", प्लॉट नं ८०४–बी,

डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.

पिन : ४०००१४

दूरध्वनी : ४४ ३३ ६१

# अनुक्रमणिका – जुलै १९७९


१) संपादकीय — आषाढ पौर्णिमा, गुरुपौर्णिमा, व्यास पौर्णिमा

२) दैठण्याचे सत्पुरुष – ठाकूरबुवा — श्री. क. हि. काकरे

३) विश्वविद्यापीठ शिरडी — डॉ. के. भ. गव्हाणकर

४) शरण जा उदारा पांडुरंगा — श्री. अनंतराव चितांबर

५) श्रीबाबांच्या पालखीची कथा — कै. द. शं. टिपणीस

६) अनपेक्षित बदल — सौ. उषा प्र. अधिकारी

७) शिरडी समाधी मंदिर — श्री. रमेश डी. चव्हाण

८) जेथे जातो तेथे पाठीराखा — श्रीस्वामी संजयानंद

९) कारुण्यमूर्ती श्रीसाईबाबा — श्री. सुशीलानंद स्वामी

१०) श्रीसाईबाबांचा गुरुमार्ग — श्री. चकोर आजगावकर

११) शिरडी वृत्त — एप्रिल व मे ७९

१२) वात्सल्यसिंधु साई — मधुकर सी. मंडलीक


—☆—

## • श्री गुरूपौर्णिमा उत्सव •

प्रति वर्षाप्रमाणे यंदाही श्रीगुरूपौर्णिमा श्रीसाईबाबा संस्थान शिरडी तर्फे शिरडी येथे दिनांक ८–९ व १० जुलै १९७९ रोजी साजरा होत आहे. तरी सर्व साईभक्तांनी हेच निमंत्रण समजून संपूर्ण कार्यक्रमास हजर राहून सर्वतोपरीने सहकार्य द्यावे अशी विनंती मे. कोर्ट रिसिव्हर साहेब श्रीसाईबाबा संस्थान शिरडी हे करतात. उत्सवाची संपूर्ण कार्यक्रम पत्रिका याच अंकात इतरत्र छापलेली आहे.

## संपादकीय –

स. न. वि. वि.

# आषाढपौर्णिमा–गुरूपौर्णिमा–व्यासपौर्णिमा

श्रीसाईलीला मासिकाचा हा खास गुरूपौर्णिमा अंक ऐन पौर्णिमा उत्सवात साईभक्त प्रेमींच्या हाती देण्यात आम्हास नेहमीप्रमाणेच आनंद वाटत आहे. श्रीसाईबाबांच्या ६०–६१ व्या पुण्यतिथीच्या निमित्ताने आम्ही वर्षभर तेरा खास अंकांची योजना पद्धतशीरपणे जाहीर केली, त्या मालिकेतला हा नववा खास अंक आहे. कोणत्याही संपादकाला आपल्या नियतकालिकाचा खास अंक काढावयाचा म्हटले की किती महत् प्रयास पडतात हे अनेक संपादकांनी आम्हाला वेळोवेळी सांगितले आहे. परंतु आम्ही सतत प्रयत्नशील राहून आतापर्यंत न चुकता नऊ खास अंक यशस्वीरित्या प्रकाशित केले. या कार्यव्यापाला सर्वस्वी साईभक्तांचा म्हण-ण्यापेक्षा साईबाबांचाच हात लागलेला आहे असे आम्ही समजतो.

श्रीसाईनाथांच्या ६० व्या व ६१ व्या पुण्यतिथीच्या निमित्ताने महाराष्ट्रातील अनेक नियतकालिकांनी आपापल्या परीने श्रीसाईबाबा खास अंक काढण्याचे जाहीर केले आहे. त्या सर्वांना आम्ही फक्त आर्थिक बाब सोडून सर्वतोपरीने सहकार्य करीत आहोत. अनेक संपादक व व्यवस्थापक मंडळी शिरडीत गेल्या मे महिन्यात येऊन आवश्यक ती टाचणे टिपणे-छायाचित्रे घेऊन गेलीत. श्रीसाईनाथांचा व त्यांच्या तत्वज्ञानाचा या कालात जास्तीत जास्त प्रचार प्रसार व्हावयास हवा आहे हीच आमची या मागची भूमिका आहे, व त्यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील आहोत.

गुरूपौर्णिमा हा स्वतः श्रीसाईबाबांनी शिरडीत सुरू केलेला उत्सव आहे. या उत्सवात शिष्यांनी आपल्या गुरूंची मनोभावे पूजा करावयाची असते असा दंडक आहे. व्यासपौर्णिमा असेही या उत्सवास म्हणतात. भगवान व्यास हे आपल्या सर्वांचे गुरू. म्हणून त्यांची पूजा आपण सर्वजण करतो. गुरू-शिष्याचे नाते व त्याचे महत्त्व ओळखून बाबांनी हा उत्सव सुरू केला. गेली ७२ वर्षे हा उत्सव अखंडीतपणे शिरडीत चालू आहे. १९०८ साली बाबांच्या प्रेरणेने द्वारकामाईत या उत्सवाला सुरूवात झाली. बाबांच्या एकसष्ठी निमित्य या उत्सवाला यंदा आगळेच स्वरूप प्राप्त होत आहे. तेव्हा या उत्सवासाठी आपण सर्व साईभक्त शिरडीत गोळा होऊ या व आपले गुरू जे बाबा त्यांना वंदन करू या. होणाऱ्या तीन दिवसांच्या उत्सव कार्यात सर्वांनी सहकार्य देऊन कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी यत्न करू या हीच या प्रसंगी प्रार्थना.

॥ जय श्रीसाईराम ॥

# दैठण्याचे संतश्रेष्ठ श्री दत्तबुवा ठाकूर

—श्री. क. हि. काकरे,
कोर्ट रिसिव्हर, श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडी.

* श्री. ठाकूरबुवांचे मूळचे घराणे काशीचे. या घराण्याचे आद्यपुरुष श्री. बोवाजी-बुवा. ते देखील महान संत होते. एकदा काशी येथें त्यांनी पंढरीच्या पांडुरंगाचे कीर्तन ऐकले. पांडुरंग कीर्तनात रंगले होते. कीर्तन संपल्यावर पांडुरंगानी त्यांना पंढरपूरचे महात्म्य सांगून पंढरपुरास येण्यास सांगितले. त्याप्रमाणे बोवाजीबुवा पंढरपुरात येऊन राहिले आणि भजन किर्तनात रंगले. पांडुरंगांनी त्यांना सांगितले की, तू मोगलाईमध्ये सेनगावला राहा आणि तिथून आषाढी, कार्तिकीची पंढरीची वारी करीत जा. त्याप्रमाणे ते सेनगावहून आषाढी कार्तिकीची वारी करू लागले. एके रात्री बोवाजीबुवा झोपले असताना स्वप्नात पांडुरंग, शंकर आणि दत्तात्रेय देवानी दर्शन देऊन विचारले की 'तू आम्हापैकी कुणाचा भक्त आहेस,' बोवाजी-बुवा म्हणाले, तुमची बाह्यरुपे जरी निरनिराळी असली तरी तुम्ही एकच आहात म्हणून मी तुम्हां सर्वांचा भक्त आहे. हे ऐकून देव प्रसन्न झाले आणि त्यांनी वर मागण्यास सांगितले. बोवाजीनी वर मागितला की, माझ्या कुटुंबात सतत पंढरपूरची वारी असावी.

बोवाजीबुवा नंतर शंकरबुवा, गोविंदबुवा, सखारामबुवा आणि लोभाजीबुवा अशा ४ पिढ्या गेल्या आणि नंतर दत्तबुवांची पिढी आली.

दत्तबुवा ठाकूर घराण्यातील सर्वश्रेष्ठ संत पुरुष. ते सेनगावला राहात. त्यांचे पूर्वज फक्त आषाढी आणि कार्तिकी पंढरपूरच्या वाऱ्या करीत. दत्तबुवांनी मासिक वारी सुरू केली. प्रत्येक महिन्याच्या शुद्ध पक्षात पंढरीची आणि वद्य पक्षात माहूरची वारी ते करीत. सोबत वारकऱ्यांचा मोठा जथ्था असे. असेच एकदा माहू-रला जात असताना वाटेत शंकर, विष्णु आणि दत्तात्रेय यांनी त्यांना प्रत्यक्ष दर्शन देऊन विचारले की आम्हापैकी 'तू कुणाचा भक्त आहेस'. बोवाजीबुवांनी दिलेल्या उत्तराप्रमाणेच दत्ताजीबुवांनी उत्तर दिले. त्यावर प्रसन्न होऊन दत्तात्रेयाने त्यांना सांगितले की, यापुढे माहूरची वारी करण्याची जरूरी नाही. त्यांनी सेनगाव ऐवजी परभणी तालुक्यातील लोहगाव येथे राहून फक्त पंढरपूरची वारी करीत जावी.

तेव्हापासून दत्तबुवा लोहगाव येथे राहू लागले. ते एक अधिकारी पुरुष होते. त्यांची प्रथम पत्नी गिरजाबाई देखील एक अधिकारी सती स्त्री होती. दत्तबुवांचे आयुष्य चमत्कृतींनी भरलेले आहे. त्यांना त्रास देण्यासाठी गावकऱ्यांनी त्यांना राहायला ब्रह्मराक्षसाचे वास्तव्य असलेला वाडा दिला. पति-पत्नी वाड्यात राहायला लागले. ते रात्रंदिवस भजन कीर्तनात दंग असत. त्याचा ब्रह्मराक्षसाला त्रास व्हायला लागला परंतु त्याबद्दल दत्तबुवांशी बोलण्याचे त्याला धैर्य होईना.

दत्तबुवा वारीला गेले असताना गिरजाबाई देखील रात्रंदिवस भजनात दंग असे. ब्रह्मराक्षसाने संधी साधून त्यांना सांगितले की, तुमच्या भजनाचा मला त्रास होतो आहे, तरी भजन बंद करा नाहीतर वाडा सोडून जा. गिरजाबाई अधिकारी स्त्री होती. ती ब्रह्मराक्षसाच्या धमक्याना थोडीच भीक घालणार ! तिने त्याला बजावले, तुला जर माझ्या भजनाचा त्रास होत असेल तर तूच वाडा सोडून चालता हो. शेवटी ब्रह्मराक्षसास वाड्यातून पळ काढावा लागला. हे पाहून गावकऱ्यांना विस्मय वाटला. दत्तबुवा वारीहून परत आल्यावर गावकऱ्यांनी गिरजाबाईची प्रशंसा करून झालेली हकीकत त्यांना सांगितली.

शिरळी गावचे रामभाऊ कुलकर्णी आणि टेंभुर्णीचे एसनाक महार हे देखील निष्ठावान वारकरी होते. ते प्रत्येक वारीला दत्तबुवांबरोबर पंढरीला जात. एकदा वारीची वेळ आली असताना रामभाऊ कुलकर्णी एसनाक महाराला बोलवण्याकरिता टेंभुर्णीला आले. त्यावेळी एसनाकच्या घरात शोककळा पसरली होती, कारण एसनाक हा मरण पावला होता. रामभाऊ एसनाकला म्हणाले, अरे ठाकूरबुवा म्हणत की एसनाकच्या अजून सात वर्षे वाऱ्या शिल्लक आहेत तेव्हा तू आताच कसा चाललास ?

एवढं म्हणण्याचा अवकाश, एसनाक खडबडून उठून बसला. आणि रामभाऊबरोबर लोहगावला आला. ते दोघे ठाकुरबुवाबरोबर पंढरीला वारीकरिता गेले.

एकदा ठाकूरबुवांनी भंडारा केला, आणि पुष्कळ अन्नदान केले, देशमुखांच्या स्त्रियाही जेवणाकरिता आल्या होत्या. ठाकूरबुवांनी गिरीजाबाईस सांगितले की, ह्यांची ओटी भरा. गिरीजाबाईनी घरात तांदळाची खूप शोधाशोध केली, पण तांदुळ मिळाले नाही. ठाकूरबुवांनी हे ताडले आणि गिरीजाबाईस सांगितले.

'तू काळजी कशाला करतेस ?' जवळच फुललेल्या निखाऱ्यांनी भरलेली शेगडी होती. ठाकूरबुवांनी तिला सगितले की ह्या निखाऱ्यांनी ओटी भर. गिरीजा-

बाईंनी खरोखरच शेगडीत हात घालून धगधगते निखारे ओंजळीत भरले आणि देशमुख स्त्रियांच्या ओटी भरल्या. आश्चर्य हे की त्या धगधगत्या निखाऱ्यांची आंच त्यापैकी कुणालाही लागली नाही. प्रभु रामचंद्राने सीतामाईची ज्याप्रमाणे अग्निपरीक्षा घेतली होती तशीच ही अग्निपरीक्षा ठाकूरबुवांनी गिरीजाबाईची घेतली.

ठाकूरबुवांचा वारीस जाण्याचा आदला दिवस. गिरीजाबाई म्हणाल्या 'मला उद्या वैकुंठाला जावयाचे आहे तेव्हा तुम्ही ह्यावेळेस वारीला जाऊ नका.' ठाकूरबुवा म्हणाले 'आम्ही निष्ठावान् वारकरी, आमच्या वारीत कधीही खंड पडणार नाही. तुम्हाला जर वैकुंठास जावयाचे असेल तर आजच जा म्हणजे उद्या आम्हाला वारीकरता निघता येईल.' त्याप्रमाणे गिरजाबाईंनी त्याच दिवशी देह ठेवला. पण प्रेतयात्रा स्मशानाकडे जात असता, ठाकूरबुवा बरोबर येत आहेत किंवा नाही ह्याची खात्री करण्याकरिता गिरजाबाईंनी डोळे उंचावून पाहिले तेव्हा ठाकूरबुवांनी हाताने त्यांना खुणावले की, हे काय ? लोकांना ढोंग दाखवणे ? गिरजाबाईंनी पुन्हा डोके खाली केले आणि स्मशानात त्यांच्या प्रेताचे दहन करून सर्वजण परतले. दुसऱ्या दिवशी नियमाप्रमाणे ठाकूरबुवा वारीला निघून गेले.

पंढरीला पांडुरंगाचे दर्शन घेऊन ठाकूरबुवा परत फिरले. चंद्रभागेच्या वाळवंटावर वास्करबुवांचे कीर्तन चालले होते, पण कीर्तन करताना ते टाळ वाजवीत आणि पांडुरंग त्यांच्या मागे उभे राहून भजन म्हणत. कीर्तन करणारे फक्त वास्करबुवाच लोकांना दिसत, पण त्यांच्या मागे भजन म्हणणारे पांडुरंग लोकांना दिसत नसत. भजन करताना देव इतके नाचले की त्यांना दरदरून घाम फुटला. त्यानंतर पांडुरंगानी ठाकूरबुवांना प्रत्यक्ष दर्शन दिले.

शिरळी गावी रामभाऊ कुलकर्णींचे भजन चालले होते त्यावेळी धिरजगीर महाराज तेथे होते. त्यांनी प्रसन्न होऊन विचारले की 'तुझे गुरु कोण ?' रामभाऊंनी आपले गुरू दाखविण्याकरता धीरजगीरांना औंढानागनाथ इथे आणले. ठाकुरबुवा कीर्तनात दंग होते. धीरजगीर मंदिराबाहेर कडासन घालून बसले. त्यांनी सूर्याला अस्त होण्यापासून रोखून धरले. त्यामुळे कीर्तनही लांबायला लागले. लोकांनी दत्तबुवांना विचारले, 'सूर्यास्त का होत नाही ?' दत्तबुवा म्हणाले, मंदिराबाहेर एक सत्पुरुष कडासन घालून बसले आहेत त्यांनाच विचारा.' दत्तबुवांचे हे उत्तर ऐकताच धीरजगीरांना आश्चर्य वाटले व दत्तबुवांच्या अधिकाराची प्रचिति आली, कारण दत्तबुवांनी त्यांना तिथे बसलेले पाहिले नव्हते. तेव्हापासून धीरजगीर दत्तबुवांबरोबरच राहायला लागले. दोघे मिळूनच पंढरपूरची वारी करू लागले.

दत्तबुवा व धीरजगीर आषाढी वारीकरता लोहगावहून निघून धारासूरपर्यंत आले. सोबतची माणसे, तुकारामाची गाथा पोथी आणि इतर सामान मागाहून येणार होते. धारासूर येथे त्यांनी पाहिले, दक्षिणेतील गंगा म्हणजेच गोदावरी नदी महापुरामुळे दुथडी भरून चालली होती. दत्तबुवांनी हात जोडून गंगामाईला प्रार्थना केली की, 'हे माई आम्ही वारकरी. आमचा वारीचा नेम कधी चुकणार नाही. वारीत कधी खंड पडायला नको. तूं जर आमची वाट आडवायला लागलीस तर आमच्या व्रताचे पालन कसे होईल ?' काय आश्चर्य ! नदीतील पाणी दुभंगून त्यांची वाट मोकळी झाली. ते नदी ओलांडून पैलतिरी गेले आणि त्यांनी कान्हेगावी मुक्काम केला. दुसरे दिवशी इतर राहिलेली वारकरी मंडळी सामानासह गोदावरी नदीकाठी आली. नदीला पूर कायम होता. आदल्या दिवशी अधिकारी पुरुष दत्तबुवाना वाट करून देण्याचा अपवाद गंगामाईने केला तसा अपवाद इतरांच्या बाबतीतही थोडाच होणार होता ? ह्या माणसांना मदत करण्याकरिता गावकऱ्यांनी रिकाम्या माठांच्या सांगडी तयार करून त्यावर माणसे बसवून आणि सामान लादून पैलतिरी पोहोचविण्याचा प्रयत्न केला पण तो फसला. गंगेच्या धारेच्या प्रवाहात सांगडी उलटल्या आणि तुकाराम महाराजांच्या गाथ्यांसह सर्व सामान बुडाले. माणसे मात्र वाचविण्यात आली.

दत्ताजीबुवा लोहगावला वारी पोहोचवून परत धारासूरला आले. त्यांनी गोदावरीमाईच्या पात्रात खडकावर मोठा उत्सव केला. मोठ्या प्रमाणात अन्नदान केले. २१ मण ६ शेराचे पुरण शिजविण्यात आले. सर्व पदार्थ तयार करण्यात आले. पंक्तीवर पंक्ति उठल्या. पुष्कळ लोक जेवायचे राहिले होते. अशा वेळी आणलेले तूप संपले. ऐनवेळी एवढ्या मंडळीना पुरेल इतके तूप तिथे कसे मिळणार ! आणि तुपाशिवाय पुरणपोळीचे जेवण तरी कसे होणार ? सर्व मंडळी काळजीत पडली. बातमी दत्तबुवांच्या कानी गेली. त्यांनी सांगितले, काळजीचे कारण नाही. तुम्ही जाऊन गंगामाईला प्रार्थना करून सांगा की 'ठाकूरबुवांनी तूप परत करण्याच्या बोलीवर उसनवार मागितले आहे. आणि ते द्यावे.' त्याप्रमाणे लोकांनी त्यांचा निरोप गंगामाईला सांगितला आणि गंगामाईच्या वाहत्या प्रवाहातील पाणी घागरीत भरून आणले. घागरी पंक्तिच्या ठिकाणी जमिनीवर ठेवल्या तेव्हा त्यात थिजलेले घट्ट तूप आढळले. उरलेली माणसे जेवली. कालांतराने कबूल केल्याप्रमाणे दत्तबुवांनी उसने घेतलेले तूप परत करण्याच्या भावनेने तुपाच्या भरलेल्या घागरी गोदावरीमाईच्या प्रवाहात ओतल्या. काय आश्चर्य ! तूप पाण्यात पडताच ते पाण्याशी एकरूप झाले. पाण्यावर तुपाचे तरंग मुळीच उठले नाहीत. धारासूर येथे गंगेच्या वाळवंटात दत्तबुवांचे कीर्तन ऐकण्यासाठी प्रत्यक्ष गंगामाई कासवाच्या रूपात आली.

दत्तबुवा ठाकूर आणि धीरजगीर वारीला जात असताना त्यांचा मुक्काम दैठणा येथील मारुतीच्या पारावर झाला. रात्री दत्तबुवांचे कीर्तन झाले आणि त्यानंतर ते झोपले असताना स्वप्नात प्रभुरामचंद्र व महारुद्र येऊन त्यांनी सांगितले की, "दैठणा हे पवित्र ठिकाण आहे. ह्या गावी प्रभुरामचंद्रानी यज्ञ केला होता. तेव्हा ह्या पवित्र गावी राहून पंढरपूरची वारी करीत जाणे." तेव्हापासून ते दैठणा गावी राहू लागले. दैठण्याचे पाटील गोविंदराव यांनी दत्तबुवांना मारुती मंदिराच्या पूर्वेस व धीरजगीर महाराजांना राहाण्याकरिता उत्तरेस जागा दिल्या. लोहगावी दत्तबुवांचा मुलगा हरीबाबा राहू लागला.

कार्तिक शुद्ध १ ला, पंढरपूरहून आळंदीच्या वारीकरिता दत्तबुवा, धीरजगीर महाराज आणि इतर मंडळी निघाली. सोबत साडेगावचा एक तेली त्याच्या बैलावर सामान लादून वारीकरता त्यांच्यात सामील झाला. पण वाटेत दिव्याच्या घाटात बैल बसला आणि गतप्राण झाला. दत्तबुवानी धीरजगीरांना सांगितले की, जा आणि बैलाला सांग की, "अशा रीतीने वाटेत धोका देणे चांगले नाही. तेल्याने आपले सामान व मुले बाळे तिथून कशी न्यावीत ! ह्याकरता तेल्याला त्याच्या घरापर्यंत पोहोचव." धीरजगीरांनी हा निरोप बैलाला पोहोचवला आणि आश्चर्य म्हणजे बैल हडबडून उभा राहिला, आणि वारी संपवून घरी पोहोचेपर्यंत सामान वाहिले घरी पोहोचताच त्याने आपला प्राणत्याग केला.

वारी आळंदीला पोहोचली. इंद्रायणी नदीकाठी दत्तबुवांनी अभंग म्हणावयास सुरूवात केली. तितक्यात तिथे वास्करबुवाची दिंडी देखील आली. भजन, कीर्तन झाले. त्यानंतर तीर्थ घेण्याकरिता दत्तबुवा इंद्रायणीच्या पाण्यात उतरले. त्यावेळी एक नवल घडले. पाण्याच्या लाटेबरोबर एक वस्तू दत्तबुवांसमोर आली. वास्कर-बुवानी त्यांना सागितले "ज्ञानेश्वरांनी हा प्रसाद तुमच्याकरता पाठवला आहे तो तुम्ही घ्या." त्याप्रमाणे दत्तबुवांनी तो घेतला आणि उघडून पाहिला. त्यात हस्तलिखीत ज्ञानेश्वरी ग्रंथ अगदी कोरडा ठणठणीत होता. त्यावर फुले, बुक्का, तुळशी वाहिलेले होते. दत्तबुवा आणि त्यापुढील ठाकूरबुवा घराण्यातील संत तो ग्रंथ स्नान करून दररोज पठण करीत. तोच ग्रंथ आतापर्यंतही दैठणा येथील ठाकूरबुवांच्या समाधी समोर ठेवलेला असतो.

दत्तबुवा ठाकूरांचा एक आवडता घोडा होता. मालकाप्रमाणेच त्याच्या अंगीही संत गुण बाणले होते. ठाकूरबुवा त्याला नेहमी आपल्याबरोबर वारीला नेत असत. तो एव्हाना म्हातारा झाला होता. वारीला गेल्यानंतर थकून जाईल ह्या विचाराने

वारीला जाताना दत्तबुवांनी त्याला घरीच बांधून ठेवले. दत्तबुवा वारीकरता पंढरपूरला गेले. इकडे घोडा बेचैन झाला. त्याने प्रयत्न करून आपले बंधन सोडून घेतले आणि एकटाच पंढरपूरला जाऊन पोहोचला. तो दशमीचा दिवस होता. पंढरपूरात पंडितांमध्ये वाद निर्माण झाला की, एकादशी आज आहे का उद्या ? प्रत्येकजण शास्त्राचा आधार देवून आपापले मत मांडत होता. पण काही केल्या निर्णय लागेना. तेव्हा गंगूकाकानी सुचविले की, ह्याचा निर्णय दत्तबुवा ठाकूरांकडून करून घ्यावा. सर्व मंडळी दत्तबुवांकडे जमा झाली आणि त्यांना त्यांनी आपली शंका विचारली.

दत्तबुवा म्हणाले ह्याचा निर्णय माझा घोडा देऊ शकेल कारण तो देखील एकादशी करतो. त्याने जर आज दाणा खाल्ला तर एकादशी आजची नाही हे निश्चित समजावे. त्याप्रमाणे हरबऱ्याच्या दाण्याचा तोबरा घोड्याच्या तोंडास बांधला आणि तो दाणा घोड्याने खाल्ला. त्यावरून दत्तबुवांनी सांगितले की, एकादशी आज नसून उद्या आहे. ह्या निर्णयाचे त्यांनी दुसरेही कारण सांगितले. खरा वारकरी पंढरीला एकादशीच्या अगोदरच दशमीला येत असतो, आणि चंद्रभागेत स्नान करतो. ज्याअर्थी घोडा पंढरपूरला आज आला आहे आणि त्याने चंद्रभागेत स्नान केले आहे त्याअर्थी आज दशमीच असली पाहिजे. दुसरे दिवशी घोड्याला हरबऱ्याचा तोबरा दिला पण त्याने तो खाल्ला नाहीं. तो घोडा मरण पावल्यानंतर चंद्रभागे काठी चिंचेच्या झाडाखाली घोड्याची समाधी बांधण्यात आली. ती नवसाला पावते असे म्हणतात.

वारीहून परतताना दत्तबुवा चंद्रभागेकाठी मंडळीसह आले तेव्हा ती दुथडी भरून वाहत होती. त्यावेळेस पांडुरंगाने स्वतः सखाराम तारूकऱ्याचे रूपात त्यांना पैलतीरी नेऊन पोहोचवले.

हैद्राबादला राजा चंदूलाल नावाचा प्रसिद्ध दानशूर प्रधान होता. त्याच्या कानी ठाकूरबुवांची कीर्ति गेली. त्यांनी ठाकूरबुवांना मोठी जहागीर व नजराणा देण्याचा प्रस्ताव केला. शिवाजी महाराजांनी देवू केलेला मोठा नजराणा तुकाराम महाराजांनी ज्याप्रमाणे नाकारला त्याप्रमाणेच ठाकूरबुवांनी तो नाकारला. ठाकूरबुवांनी त्याच्याकडे एकच मागणी केली ती म्हणजे गोपाळपुऱ्याच्या ओढ्यावर पूल बांधून देण्याची. कारण पुलाअभावी वारकऱ्यांना गोपाळपुऱ्यास जाणे अवघड होते. त्यांची ती मागणी पूर्ण करण्यात आली.

अशा ह्या संतश्रेष्ठाचे वास्तव्य दैठण्याच्या पुण्यभूमीत झाले आणि शेवटी त्यांनी आपले दोन्ही पुत्र हरिबुवा आणि नामदेव यांना पंढरपूरची वारी चालू

ठेवण्याचा उपदेश करून मिती ज्येष्ठ शु. २ शके १७५१ रोजी दैठणा येथे देह ठेविला. तिथे त्यांची समाधी बांधण्यात आली आणि भजन किर्तनाकरिता मोठा सभामंडप तसेच बाहेरगावाहून येणाऱ्या भक्तगणांना राहण्यासाठी ओवऱ्या बांधल्या. ह्या सभामंडपात नेहमी भजन-कीर्तन चालत असते. ह्याच संतश्रेष्ठामुळे दैठणा गावाला ठाकूरबुवांचे दैठणे असे नाव पडले. दरवर्षी पुण्यतिथी दिनी दैठणा येथे यात्रा भरत असते. पंढरपूर येथेही ठाकूरबुवांचा प्रसिद्ध मठ आहे.


# * श्रीसाईलीला *

## सर्वांगसुंदर भव्य दिवाळी अंक १९७९

* भगवान श्रीसाईबाबांच्या जगभर पसरलेल्या असंख्य साई भक्तांना आलेल्या बाबांच्या विषयीच्या विविध अनुभवांनी अगदी गच्च असा सुंदर संग्राह्य वाचनीय अंक ऐन दिवाळीत थाटात प्रसिद्ध होणार.

* श्रीसाईभक्तांनी आपापले नवे, ताजे श्रीबाबांच्या बद्दलचे अनुभव कागदाच्या एकाच बाजूस थोडक्यात सुवाच्य लिहून ते **२० ऑगस्ट १९७९** पर्यंत संपादक श्री साईलीला, 'साईनिकेतन,' ८०४ बी डॉ. आंबेडकर मार्ग, दादर मुंबई ४०० ०१४ या पत्यावर पाठवावेत. वरील तारखेनंतर आलेल्या कोणत्याही मजकुराचा स्वीकार करता येणार नाही.

**प्रसिद्धीची तारीख १५ ऑक्टोबर १९७९**

**मुखपृष्ठावर** बाबांचे मनोहर चित्र **किंमत सव्वा रुपया**

# विश्वविद्यापीठ–शिरडी

— डॉ. के. भ. गव्हाणकर
इंदिरा निवास, आग्रा रोड, कुर्ला, मुं. ७०

● विश्वभासरजनी मावळून आत्मतत्वचअंशूचे सम्यक ज्ञान करून देऊन आत्मस्वरूप तेजोगोलकाचे दर्शन व शाश्वत सुखशांतीचा यथेच्छ लाभ करून देणारे ठिकाण म्हणजे श्रीसाईबाबांची शिरडी होय.

श्रीसद्‌गुरू साईबाबांनी अनेक भक्तांना ज्ञानोपयोगी शिक्षण देऊन शिरडी येथे त्यांच्याच साहाय्याने विश्वविद्यापीठाची स्थापना केली असे म्हटल्यास वावगे होणार नाही. या विद्यापीठाचे मुमुक्षूकरिता पाच विभाग करता येतील :– (१) बालविद्या (२) मध्यमविद्या (३) उच्चविद्या (४) प्राज्ञविद्या व (५) श्रेष्ठविद्या.

(१) **बालविद्या विभाग**– अंतर्बाह्य (शरीर व चित्त) शुद्धीकरिता स्नानसंध्यादी विहित कर्मे, नामस्मरण, भजन, पूजन, अर्चन, धर्मग्रंथपठन, श्रवण व कथनादि नवविद्या भक्तिपूर्वक, सुलभ कर्माधिकारी मंदमुमुक्षू भक्तसमूह ज्या विभागात अभ्यास करतो तो बालविद्या विभाग होय. याचे स्थल बाबांचे-गुरूरायांचे समाधिस्थान होय.

(२) **मध्यम विभाग**– अंतर्बाह्य शुद्धीकरिता आत्मसंयमयुक्त, वर्णाश्रम धर्म, नियम, कृच्छ-चांद्रायणादि व्रत परिपालनानुष्ठानाधिकारी मुमुक्षू भक्तगण ज्या विभागात अभ्यास करतो ते. याचे स्थल बाबांचे-गुरूरायांचे समाधिस्थान.

(३) **उच्चविद्या विभाग**– केवळ चित्तशुद्धीकरीता श्रीमद्भगवद्गिता, ब्रह्मसूत्र उपनिषदादि वेदान्त ग्रंथाध्ययन, पठन, कथन, मनन, निदिध्यासन, ब्रह्मचिंतन, कर्मब्रह्मार्पणादि उपासनाधिकारी छात्रसंघ ज्या विभागात अभ्यास करतो तो. याचे स्थल बाबांचे शयनागार ( चावडी ) होय.

(४) **प्राज्ञविद्या विभाग**– धौती, बस्ती, नेती, नौली, त्राटक, कपालभाति. क्रियायुक्त, भीषण व उग्र तपस्यान्वित, खंड इत्यादि योगाधिकारी तीव्र मुमुक्षू भक्तिसंघात ज्या विभागात अभ्यास करतो तो. याचे स्थल बाबांचे तपोद्यान ( लेंडीबाग ) हे होय.

(५) **श्रेष्ठ विद्या विभाग**– सम्यक आत्मज्ञान, पूर्ण व कडकडीत वैराग्य, अलोट गुरूकृपा सच्चिदानंद स्थिती, सहज समाधिस्थिती, नित्य संतोष, अखंड सुख, शाश्वत शांती, अतएव सायुज्य मुक्ति-अधिकारी, तीव्र मुमुक्षू छात्रवृंद ज्या विभागात अभ्यास करतो तो. याचे स्थल बाबांची द्वारकामाई हे होय.

या विश्वविद्यापीठाचे केंद्रस्थान फक्त एक शिरडीच. यातील मुख्याध्यापक सर्व विश्वात फक्त बाबाच. यातील मुख्य व अंतिम शिक्षण फक्त सायुज्य मोक्षच. यांतील मुख्याध्यापकाचे मुख्य आसन फक्त एक द्वारकामाईच.

हल्ली विद्यापीठात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास शिकवण्याकरिता विद्वान, वेतनी, उपशिक्षक, विद्यार्थी (फेलो) नेमतात किंवा उच्चविद्यालयात विना-मूल्य उपगुरु (मॉनिटर) नेमतात. तसे बाबा कधी कधी आपल्या हाताखाली कै. भक्तवर्य नानासाहेब चांदोरकर, माधवराव देशपांडे, काकासाहेब दीक्षीत, आण्णासाहेब दाभोळकर, दासगणू महाराज वगैरे भक्तश्रेष्ठांना विनावेतन उपशिक्षकाची कामगिरी सांगून त्यांच्याकडून आपल्या विद्यापीठातील शिक्षणाचे काम करून घेत असत.

शिरडीच्या विश्वविद्यापीठातील शिक्षण देण्याची पद्धत व वेळ हल्लीच्या शिक्षण खात्यातील विद्यापीठ (कॉलेज) व विद्यालयाच्या (हायस्कूलच्या) नियमित व कालखंड शिक्षण वेळेसारखी नव्हती. बाबा वेळेचे खंडही पाडीत नसत. विद्यार्थ्यांची तयारी, उत्साह, उत्कंठा, उपजीविकेच्या धंद्याशी निगडीत झालेला काळ. शरीरप्रकृती याकडे पूर्ण लक्ष देऊन बाबा विद्यार्थ्यांना शिक्षण देत. हल्लीच्या विद्यापीठातील अगर विद्यालयातील मनसोक्त सुट्या घेण्याची बाबांची पद्धत नव्हती व नाही. या विद्यापीठात सर्व जातींचे, सर्व धर्माचे स्त्री, पुरुष, मुले, सशक्त, अशक्त, रोगी, निरोगी, सर्वांनाच येण्याची मोकळीक होती.

या विद्यापीठात प्रवेश मिळण्यास प्रथम कोणास प्रवेश परीक्षा किंवा प्रवेश-शुल्कही द्यावे लागत नसे. पण पुढेपुढे विद्यार्थ्यांची गर्दी जसजशी फार वाढू लागली तसतशी परमार्थ विरोधक व विघातक बृहदारण्यकोपनिषदात सांगितलेल्या चार एषणां (इच्छा) पैकी पहिल्या दोन एषणा (द्रव्य व स्त्री) मुमुक्षू विद्यार्थ्यांच्या मनातून थोड्या तरी कमी झालेल्या आहेत किंवा नाहीत हे पाहाण्याकरिता बाबांनी दक्षिणा व श्रीराधाकृष्ण आई ह्या दोन कसोट्या (परीक्षा) किंवा चाळणी शिरडीत आपल्या जवळ निर्माण केल्या.

या विद्यापीठाच्या बारीकसारीक, लहान मोठे, सोपे अवघड असे अनंत विषय शिकवले जात, पण स्थूलदृष्ट्या त्यांचे दोनच मुख्य भाग पडतील.

(१) व्यवहारदक्ष होऊन न्यायाने धन मिळवावे व त्याचा न्यायाने खर्च करावा. सदाचरणाने, स्वधर्मपरिपालनाने (काल व परिस्थिती लक्षात घेऊन) नेकीने नेटका संसार करणे, संसारास कंटाळू नये. निरोद्योगी राहू नये, लोकसंग्रह करावा.

(२) गुरू, माता, पिता, गाव, मातृभूमी यांची निरंतर सेवा करून भक्ती, ज्ञान, वैराग्य या साधनांनी संपन्न होऊन आत्मप्राप्ती करून घेणे.

शरीरशुद्धी, चित्तशुद्धी, आत्मसंयमन, विहित कर्माचरण, व्रत परिपालन उपासना, तपस्या, ब्रह्मचिंतन, कर्मब्रह्मार्पण, नैष्कर्म्य, भक्ती, ज्ञान, वैराग्य, स्थित प्रज्ञता, गुणातीतत्व, पुरुषोत्तमत्वप्राप्ती व अंती अखंड सच्चिदानंद शांतिसुखाचा लाभ (पदवी) या विषयांचा अभ्यास या विद्यापीठात शिकविला जात असे. बाबा सर्व ज्ञात, अज्ञात जागतिक भाषेत शिक्षण देत असत.

बाबा मराठी व हिंदी बोलत. अरबी किंवा फार्सी भाषा व इंग्रजी भाषा त्यांना अवगत होती. तसेच त्यांनी सर्व मद्रास इलाखा जो आपल्याकडे लोहचुंबकाप्रमाणे आकर्षण करून घेतला, त्यातील स्त्रीपुरुषांना व मुलांना स्वप्नात जे अनुभव दिले, त्यांची इच्छित कार्ये केली, त्यांचे रोग निवारण करून शंकानिरसन केले ते कानडी, तेलगू, तामीळ व मल्याळी भाषेतूनच. गुर्जरदेशस्थ भक्तांना त्यांनी जे अनुभव स्वप्नात दिले आहेत ते त्यांच्या गुजराथी भाषेतूनच. यावरून बाबांना ज्ञात अज्ञात सर्व भाषा अवगत होत्या हे उत्तम प्रकारे सिद्ध होते. बाबा सिद्ध, जीवनमुक्त, महायोगेश्वर व जगदात्मे असल्यामुळे त्यांना सर्व भाषांचे ज्ञान असणे साहजिकच होते व त्या त्या भाषेच्या विद्यार्थ्यांस ते त्या त्या भाषेत शिक्षण देत असत, हे अगदी खरे आहे.

आपल्या सर्व शिक्षणसंस्थांतून जागृतावस्थेतच शिक्षण देण्यात येते. पण बाबांच्या विद्यापीठाचे तसे नाही. बाबा सर्व विद्यार्थ्यांना जागृतावस्थेत, स्वप्नात व समाधी अवस्थेतही शिक्षण देत असत. त्यांची शिष्यजनांवर अलोट प्रीती असे. त्यांचे शिक्षण खऱ्या अंतःकरणाचे होते, हल्लीसारखे वैतनीक धनलुब्ध नव्हते. कधी कधी बाबा समाधीत किंवा सहजानंदात असल्याकारणाने ते झोपी गेले आहेत किंवा त्यांना डुलकी लागली आहे असे कोणाकोणाला वाटे, पण बाबा सदैव जागृतच असत व आहेत. त्यांना झोप किंवा डुलकी कधीही येत नसे व नाही. त्यांचा भक्तप्रेमाब्धी कधीही

आटला नव्हता व नाही किंवा वरवर दिसणाऱ्या क्रोधरूपी वडवानलाने तो कधी शुष्क होत नसे व हल्लीही होत नाही. (बाबा हयात आहेत अशी लेखकाची खात्री आहे.)

बाबांच्या विश्वविद्यापीठाचे केंद्र शिरडी आहे. बाबांचा विद्यार्थीगण सर्व विश्वात रत्नाकराच्या असंख्य जलतरंग, आवर्त, बुदबुदाप्रमाणे (लाटा, भोवरे, बुडबुडे) विखुरलेले आहेत व तो जेथे जेथे आहे तेथे तेथे बाबांनी त्यांच्याकरिता आपल्या विद्यापीठाच्या शाखा (श्रीसाईसंस्था) उघडलेल्या आहेत. या सर्व शाखा गुप्तपणे मुख्य केंद्रास जोडलेल्या आहेत. मुख्य केंद्राखेरीज इतर शाखांच्या ठिकाणी मुमुक्षू विद्यार्थीजनांनी कितीही जरी अभ्यास केला तरी मुख्य केंद्रात (शिरडीत) येऊन श्रीसद्‌गुरु मुख्याध्यापकाच्या दिव्य व पवित्र समाधीचे पुण्यदर्शन घेतल्यावाचून त्यांचे मन वृद्ध होत नाही व अध्ययनपूर्तीही होत नाही. हा त्या अद्वितीय व अलौकिक केंद्रभूमातेचा स्थानमहिमा आहे. तिचे आकर्षण असेच विलक्षण, ऐंद्रजालिक व लोहचुंबकासारखे आहे. तथापि कोणाची कितीहि तीव्र उत्कंठा असली व तो कितीही साधनसंपन्न असला तरी त्याला मुख्याध्यापक गुरुमाऊलीची आज्ञा व प्रेरणा झाल्यावाचून या केंद्र-स्थानाचे दर्शन घडतच नाही.

इतरत्र कितीही शिक्षण मिळाले तरी बाबांच्या समाधि दर्शनात, बाबांच्या शयनगार दर्शनात, तपोवन दर्शनात व श्रीद्वारकामाई दर्शनात तेथील एकंदर शांत वातावरणात, तेथील एकांत निवासात, तेथील नित्य कार्यक्रमांचे सूक्ष्म निरीक्षण करण्यात-बाबांच्या अतींद्रिय, दैवी, चिद्वैराग्यवैभवाच्या पुण्यस्मरणात व जणू काही आपण बाबांच्या प्रत्यक्ष सान्निध्यात बसलो असून बाबा मंदस्मित मुद्रेने व लडिवाळ-पणे आपल्याकडे पाहात आहेत, आपल्याकडे बोलत, हसत आहेत, खेळत आहेत असा भास होऊन अष्ट सात्विक भाव निर्माण झाल्यामुळे सुषुप्तावस्थेतील परमात्म-दर्शनलाभजन्य आनंदाप्रमाणे शांति सुखाचा अद्वितीय अनुभव घेण्यात जे शिक्षण मिळते ते खरोखर अत्यंत श्रेष्ठ, अवर्णनीय व अनुपमेय आहे.

इतर विद्यालयात बहुधा बोलून व लिहून शिक्षण दिले जाते. म्हणजे शिक्षकांचे मुख, नेत्र, कान, हात, पाय, ही पाचच इंद्रिये शिक्षणाचे कार्य करीत असतात. बाबांच्या विद्यालयात तसे नाही. येथे अध्यापकाची पंच ज्ञानेंद्रिये व पंच कर्मेंद्रिये आपआपल्या हालचाली, 'व्यापार व चेष्टा यांच्याद्वारा शिक्षणाचे काम निरंतर करीत असत व हल्लीही करतात. या विद्यापीठात येणाऱ्या बहुतकरून प्रत्येक विद्यार्थ्यास

अनर्थ नामाभिधान करणे. त्याच्या कोड्यांचा किंवा संकटांचा त्या न सांगताही उलगडा करणे, त्याने विचारलेल्या शंकांचे निरसन करणे, प्रश्नांना उत्तरे देणे, चुकांची दुरुस्ती करणे, नाना प्रकारच्या ज्ञानाच्या गोष्टी सांगणे, नाना विद्यालीला व चमत्कार करणे, भक्तांचा बुद्धिभेद न करता निरनिराळ्या स्थितीत उपदेश करणे, भक्तांशी गोड बोलून त्यांची समजूत घालणे, कासवीप्रमाणे भक्ताकडे आपल्या नेत्रांनी अवलोकन करणे, त्यांच्यावर कधीकधी अनुरागाने रागावणे, त्यांना गालिप्रदान करणे, त्यांना सटक्याने किंवा विटेच्या तुकड्यांनी मारणे, डोके धरून ते खांबावर आपटणे, शेळीच्या नऊ लेंड्यापैकी एखादी तरी घेणे, अशा सांकेतिक खुणांनी सगुणोपासना करण्यास शिकवीत असत.

स्वतःच्या आचरणाने आत्मसंयमन करण्यास, विकारांवर प्रभुत्व निर्माण करण्यास, वस्तुपरिग्रहापासून परावृत्त करण्यास, सर्वसंगपरित्याग करून संसारात राहूनही विरक्त होण्यास. कर्मकर्तुत्वाच्या अंहकाराचे उच्चाटन करण्यास, वेदांचे व धर्माचे परिपालन करण्यास, स्वज्ञातीचा, हिंदुत्वाचा, आपल्या वाडवडिलांचा अभिमान बाळगण्यास, वर्णाश्रमधर्मप्रमाणे विहित कर्म करण्यास, परमेश्वर, माता, पिता, गुरू, गोमाता, स्वदेश, भूमाता संतसज्जन यांच्या ठिकाणी प्रेम व श्रद्धा ठेवण्यास, श्रीज्ञानेश्वरी, नाथभागवत, रामायण, महाभारत, भागवत, भगवद्गीता वगैरे राष्ट्रधर्मग्रंथ व संतवाङ्मय यांचा सतत अभ्यास करण्यास शिकवीत असत.

श्रीगुरूमुखातील अक्षर किंवा वचन हा एक अद्वितीय व अलभ्य अद्वैत संपत्तीचा ठेवा आहे, असे समजून जो विद्यार्थीभक्त त्याकडे पूर्ण लक्ष देऊन तो उत्तम प्रकारे जतन करून ठेवील तो शिष्य खात्रीने आत्मस्वरूपाप्रत पोहचेल.

ना तरी श्रीगुरुवचना । दिठी देतु जतना ।
शिष्यु आत्मभवना– । माजि पैसे ॥ ज्ञाने. अ. १६ ॥

'हे विश्वचि माझे घर' या महनीय तत्त्वाची बाबा शिकवण देत असत.

**विद्यापीठाचे गॅदरींग**–बाबांच्या विद्यापीठातही मुख्य केंद्रांच्या ठिकाणी वर्षातील ठरलेल्या दिवसात उत्सव स्वरूपात चार वेळा जुन्या व नव्या भक्तांचे संमेलन भरते. ही संमेलने एक दिवसाची, तीन दिवसांची चार दिवसांची व पाच दिवसांची असतात. त्यावेळी भोजनादि सर्व कार्यक्रम असतात. शिवाय पालखी, रथ, भारूड वगैरे अन्य समारंभही असतात. यावेळी एकमेकांच्या पारमार्थीक ज्ञानाचा परस्परास लाभ मिळतो. तसेच, बाबांच्या पाच पुण्यस्थळांच्या दर्शनाचा लाभ मिळून

श्रीभगवान ज्ञानेश्वर माऊलीने वर्णन केल्याप्रमाणे गुरुभक्ती कशी करावी व आपले कल्याण कसे करून घ्यावे याचे या संमेलनातून उत्कृष्ट शिक्षण मिळते. सद्गुरू ही अनर्घ, अमोल, असामान्य, दुर्लभ वस्तू आहे. काया-वाचा-मने करून तिची भक्ती करणे व आपले इष्ट साध्य करून घेणे एवढेच करून त्यात समाधान न मानता श्रीविष्णूनी (श्री पंढरीस विठ्ठलांनी) आपले गुरू श्रीशंकर यांना ज्याप्रमाणे मस्तकावर धारण करून ठेवले आहे. त्याप्रमाणे आपण बाबांना सदैव डोक्यावर धारण करून नाचत राहिले पाहिजे.

बोधामृतं पिबति यो हृदि भावयित्वा । श्रीसद्गुरोःपरममंगलपादकंनम् ॥
श्रीसाईनाथकृपया सकलेप्सितेषु । कार्येषु पुरुषवरो विजये भवेत्सः ॥

---

## श्री. सदाशिवराव पाठारे यांचे देहावसान

मुलुंड, मुंबई येथील श्रीसाईभक्त श्री. सदाशिवराव शंकरराव पाठारे यांचे गुरुवार दिनांक ३ मे १९७९ रोजी सकाळी मेंदूच्या विकाराने अल्पकाळात निधन झाले. ते मुंबई टेलिफोन्समध्ये बत्तीस वर्षे 'अ' वर्गाचे अधिकारी होते. डिव्हिजनल इंजिनियर पदावरून ते सेवानिवृत्त झाले. त्यानंतर त्यांनी मुलुंडच्या एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेत एक जबाबदारीचे काम पत्करलेले होते. त्यातच त्यांचा दिवसभराचा वेळ निघून जात असे आपल्या शांत, विनोदी व प्रेमळ स्वभावामुळे त्यांनी अनेक मित्रमंडळी जमविली होती. आपल्या निगर्वी, परोपकारी व प्रामाणिक स्वभाव वैशिष्ट्यामुळे ते सर्वांनाच हवेहवेसे वाटत. त्यांच्या पश्चात, त्यांच्या पत्नी व असंख्य मित्रपरिवार आहे.

श्रीसाई मृतात्म्यास चिरसद्गती व शांती देवो. पाठारे कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

— का. संपादक

# शरण जा उदारा पांडुरंगा



[—संत तुकाराम]

श्री. अनंत जयदेव चितांबर.
तांबे ब्लॉक्स, दिल्लीदरवाजा,
अहमदनगर

●संत तुकाराम महाराज आपल्या एका अभंगात जनांना अशी हाक देत आहेत की,

"आलिया संसारा उठा वेग करा। शरण जा उदारा पांडुरंगा।

संत तुकाराम महाराज संसारी जनांना सांगत आहेत की, "बाबानो, या संसारात जन्माला आलात, तेव्हा उठा, त्वरा करा आणि परमेश्वराला शरण जा."

पंढरीनाथ पांडुरंग पंढरीनगरीत उभा आहे. तसेच तो शिर्डीतही श्रीसाईनाथांच्या आकाररूपाने उभा असून भक्तजनांचा उद्धार करण्यासाठी तो सदैव तत्पर, दक्ष आहे. संत दासगणू महाराजांचा साक्षात्कार सांगत आहे.

"शिरडी माझें पंढरपूर। साईबाबा रमावर॥

परमेश्वर श्रीसाईनाथांच्या रूपाने साक्षात् शिर्डी येथे दर्शन देत आहे, व भाग्यवंत भक्तजन धन्य होत आहेत. श्रीसाईनाथ महाराजांना शरण जात आहेत. गर्दी सारखी लोटत आहे. संसारातील दुःखे नाहीशी करून संसारातील अतृप्त इच्छा तृप्त व्हाव्यात व मनःशांति मिळावी हीच प्रत्येकाची मनीषा असणे स्वाभाविक आहे.

या मनुष्याला सहजासहजी परमेश्वराला शरण जाण्याची बुद्धी होते काय ? व पांडुरंग उदार आहे हे तरी त्याला लवकर समजते का ? या संसार सागरातून कायमचे मुक्त होण्यासाठी परमात्म्याची भक्ति मनुष्य करतो काय ? का तो केवळ

संसारसुखे वाढवून त्यात लोळत पडण्याचीच याचना करण्यासाठी त्याला शरण जातो ? या प्रश्नांची उत्तरे ज्याने त्याने आपापल्या अनुभवाप्रमाणे शोधून काढावीत हेच योग्य ! कारण भगवन्तानी गीतेत मनुष्याला स्पष्ट इशारा दिला आहे की, "उद्धवेदात्मनात्मनम्" स्वतःचा उद्धार स्वतःच करून घ्यावा. तसेच भगवान् ९ व्या अध्यायात श्लोक ३३ मध्ये सांगत आहेत.

"अनित्यम सुखं लोकमिमं प्राप्य भजस्व माम् ।

अर्थः हा लोक अनित्य आहे, सुखरहित आहे, असा अशाश्वत व दुःखमय जीवलोक–मनुष्य शरीर तुला प्राप्त झाल्यामुळे, तू मला भज–"

तेव्हा ही जीवसृष्टि, मृत्युलोक, यातील राक्षसीकृत्ये चाललेल्या जगात मनुष्यास परमेश्वराला भजण्याखेरीज दुसरे साधन, त्यातून तरण्यास समर्थ करणारे कोणतेही नाही हे भगवान् श्रीकृष्ण स्वतः सांगत आहेत. पण यातील मर्म कळण्याचे व त्याप्रमाणे कृति करण्याचे सामर्थ्य केवळ श्रीसद्गुरु श्रीसाईनाथाना अनन्यभावाने शरण जाण्यानेच मिळणारे आहे. श्रीसद्गुरु श्रीसाईबाबानी ही शाश्वतमार्गाची सोय भक्तजनासाठी करून ठेवलेली आहे. त्या उदार श्रीगुरूमूर्तिस शरण जाऊ या.

ॐ तत् सत्

88

## श्री. सदानंद चेंदवणकर यांचा शेगांव येथे सत्कार

श्रीसाईलीला मासिकाचे कार्यकारी संपादक श्री. सदानंद चेंदवणकर यांनी श्री गजानन महाराज संस्थान शेगाव यांच्या आमंत्रणावरून शेगाव येथे गेल्या मे महिन्यात भेट दिली. तिथे गेली ३८ वर्षे सतत विश्वस्त असलेले व श्री महाराजांचा अनुग्रह असलेले सत्पुरुष श्री पुरुषोत्तम हरी पाटील यांनी त्यांचा शाल, श्रीफल व श्री महाराजांची पोथी देऊन अत्यादरपूर्वक सत्कार केला. तिथे चालू असलेल्या एकंदर कार्यपद्धतीबद्दल श्री. चेंदवणकर यांनी संतोष व्यक्त केला.

# श्रीबाबांच्या पालखीची कथा

–कै. द. शं. टिपणीस,
वजिफदार लॉज, गोखले रोड, ठाणे.

● हल्ली जी पालखी आहे ती इंग्लंडहून आली, आज जेथे बाबांचे आसन असलेला मोठा दगड व तुलसी वृंदावन आहे त्यांच्या मधल्या जागेत पालखीचे पार्सल २–३ महिने पडून होते. पार्सल खोलून केव्हा पालखी तयार करू अशी उत्सुकता बाबांच्या भक्तांना लागून राहिली होती, पण बाबा परवानगी देईनात, विचारल्यास पाहू चार दिवसानी करता करता २–३ महिने गेले. भक्त अधीर झाले. पण बाबांच्या परवानगी शिवाय पार्सलला हात लावण्यास कोणी धजेना बाबांचे एकनिष्ठ भक्त श्री. र. भा. पुरंदरे यांना अधिकधीर धरवेना काहीही झाले तरी पालखी नीट जुळवून, ती फुलांनी श्रृंगारून बाबांना पालखीत बसवायचे असा त्यांनी दृढ निश्चय केला. त्यांनी बाबाना विनंति केली की अनुज्ञा द्या, आज पालखी पेटीतून काढतो व ती सजवितो. बाबा म्हणाले, "नाही. मला नाही पाहिजे पालखी, मला काही लागत नाही" पुरंदरेनी हट्टच घेतला. ते म्हणाले, "बाबा पालखी तर येऊन पडली. आता नाही म्हणून काय उपयोग? मी ती बाहेर काढतो." "मी नाही तुला बाहेर काढू देणार" "बाबा मी आज पालखी तयार करणार" असं बोलत बाबांच्या पायांना वंदन करून पुरंदरे उठले. बाबा वाटेल त्या शिव्या देऊ लागले. ते रागावले, मी तुला ठोकीत मारीन म्हणत सटका घेऊन अंगावर धावले, बाबांचा राग पाहून बरीच मंडळी पळून गेली. परंतु पुरंदरे ढिम्म, त्यांनी पार्सल खोलून पालखी काढली व सर्व भाग बसवून ते पालखी सजवू लागले. बाबांच्या शिव्या व राग हळूहळू कमी होऊ लागला. पालखी सजवून झाल्यावर पुरंदरे म्हणाले, "बाबा, आज चावडीचा दिवस आहे. आज तुम्हाला पालखीत बसवून चावडी पर्यंत मिरवणूक काढावयाची" बाबा म्हणाले, "नाही काढायची, जाय, तूं तशीच घेऊन चावडीत जा" पुरंदरे म्हणाले, "अशी रिकामीच चावडीत कशाला न्यायची? तीत तुम्हाला बसवून आज रात्री मिरवणूकी बरोबर चावडीत नेऊ" बाबा, 'नाही. मी नाही बसणार जाय तू' पुरंदरेनी पालखी गोंडे वगैरे लावून पूर्ण सजविली व बाबांच्या समोरच मंडपात ठेवली. पालखी सजवताना बाबा तिकडे सारखे पहात होते. काम झाल्यावर बाबांच्या पाया पडून व उदी घेऊन पुरंदरे घरी गेले.

त्या रात्री पालखी मिरवणूकीसाठी बुट्टी, जोग वगैरे मंडळी जमलीं, पुरंदरे जोगांना म्हणाले, 'आज घाई करू नका. पालखी शिवाय चावडी करावयाची नाही.'

जोग म्हणाले, 'आज सकाळी तुमची पूजा झाली ती थोडी झाली का ? काहीही करा मी भानगडीत पडणार नाही ' नानासाहेब म्हणाले, ' पुरंदऱ्यांचे व बाबांचे ठीक चालते. त्यांना काय करायचे ते करु द्या, पण आज घाई करू नका. ' पुरंदरे म्हणाले, ' मी मार खाल्ला तरी चालेल, पण पालखी उचलल्याखेरीज मिरवणूक निघायची नाही. ' सर्वांची इच्छा पालखीसह मिरवणूक काढावयाची होती. परंतु ते बाबांना घाबरत होते. बाबा नित्याप्रमाणे चावडीस जाण्यास तयार झाले. तेव्हा पुरंदरे व इतर मंडळी बाबांचा जयजयकार करून पालखी उचलू लागले, बाबा जोगांना म्हणाले, ' बापू आज हा काय प्रकार आहे ? ' जोग म्हणाले, ' पुरंदरे ऐकत नाही. ' बाबा ' तो फार चेवला आहे. पाहून घेईन त्याला, ' तेवढ्यात पुरंदऱ्यांनी विचारले, ' बाबा, पालखी उचलायची ना ? ' बाबा म्हणाले, ' नाही. तशी नाही उचलायची. १२५ टेंभे (मशाली) लाव व मग उचल, ' पुरंदरे गावात गेले टेंभे आणले. १२५ मशालीच्या उजेडात पालखी सह मिरवणूक निघाली. २–४ दिवस पालखी चावडीत होती, पालखीचा एक चांदीचा कळस व २–३ रेशमी गोंडे चोरीस गेले. तेव्हा सर्वांनी ठरविले की मशिदीत पालखीसाठी एक खोली बांधायची, ( आज रथ असतो तीच ती खोली. )

एक पत्र्याची खोली बांधायचे ठरले. एका बाजूला नारायण तेल्याच्या घराची भिंत व दुसऱ्या बाजूला मशिदीची भिंत होती. नारायण तेल्याच्या भिंतीला व मशिदीच्या भिंतीला तीन भोके, आडवे वासे लावण्यासाठी पाडणे जरूर होते. नारायण तेली बाबांचा भक्त असल्यामुळे त्याने भोके पाडण्याची परवानगी दिली. पण बाबा मशिदीच्या भिंतीला भोके पाडण्याची परवानगी देणे शक्य नव्हते. बाबा लेंडीवर गेल्यावर परत येण्यास त्यांना १॥–२ तास लागतात, तेव्हा त्यावेळात हे काम उरकावे असे ठरले, बाबा लेंडीवर गेल्यावर काम सुरु झाले. तेल्याच्या भिंतीला भोकं पाडून झाली व मशिदीच्या भिंतीला भोक पाडण्याचे काम सुरु होते, फकिरावाशाचे एक टोंक धरून तेल्याच्या घरावर होता व पुरंदरे घोड्यावर चढून मशिदीच्या भिंतीला भोक पाडीत होते. इतक्यात बाबा आले, बघे मंडळी पळून गेली. पुरंदरे खाली उतरले, बाबा त्याच्या जवळ आले व म्हणाले, "काय रे काय करतोस ?" "बाबा आपल्या पालखीला घर करतो." बाबा फार रागावले व म्हणाले, "मागे आला माझी मशिद खादली. अवघा पैका नेला, निंबरनी काढले आणि आता भिंत पाडतोय, चेवला आहे." बाबांनी ढकलत ढकलत त्याला सभामंडपाच्या दरवाजात नेले व चालता हो नाहीतर तुला मारीन असे म्हणून विटकूर उचलली, पुरंदरे म्हणाले, "बाबा, तुम्ही मला मारा काय

वाटेल ते करा पण मी खोली केल्या खेरीज येथून हालणार नाही." बाबांनी त्याला ढकलत ढकलत खोलीत नेले व विचारले हे तू काय करतोस? पुरंदरे म्हणाले, "बाबा आणखी एक भोक पाडावयाचे आहे. मग वासे व पत्रे टाकले की खोली तयार होईल." बाबा रागात म्हणाले, "मला नाही लागत, मला पालखी नको, तू इथून चालता हो. तू माझी बरोबरी करतोस? तेली बी गांगतो, वाणी बी गांगतो. त्वां भी मला वैताग आणला आहे, मी कोणाच्या कोरभर भाकरीचा ओशाळा नाही. बघून घेईन तुला." बाबा खूप कातावले. वाटेल त्या शिव्या दिल्या, परंतु पुरंदरे हट्ट सोडिनात की हलेनात. शेवटी थुंकून बाबा मशिदीत जाऊन बसले, पुरंदरेने काम सुरू केले. दुसरा वासा बसवून तिसऱ्या भोकास सुरवात केली. बाबांनी त्याला बोलावले व म्हणाले, "हे तू काय करतोस? तू माझी देवळी (पणती ठेवण्याचा कोनाडा) फोडशील." पुरंदरे म्हणाले, "नाही फोडणार. बाबा वाशाला आधार म्हणून थोडी खाच करायची आहे." बाबा शांत झाले व म्हणाले, बरं. जा. तुला लागेल तसं करून घे. मग आपण चांगले करून घेऊ." पुढे आरती झाली, उदी प्रसाद घेऊन मंडळी घरी गेली. पुरंदरे काम करीतच होते. मंडळी जेवून परत आली. पुरंदरेचे काम चालूच होते. बाबा काकासाहेबास म्हणाले, "याला आता काय करावे? फार चेवला आहे. सगळे लोक जेवून आले. पण हा जेवायला जात नाही." काकासाहेब म्हणाले. "त्याची रजा संपत आली आहे. तो काम आटोपू पहातो आहे. त्याला जेवावयाला पाठवू का?" बाबा म्हणाले. "तो तुझे काय ऐकतो? माझे ऐकत नाही. मोठा खट्याळ आहे. बोलाव त्याला." पुरंदरे आले व बाबांच्या पाया पडून रडू लागले. बाबा म्हणाले अरे रडतोस का? पुरंदरे म्हणाले, "बाबा, सकाळी तुम्ही माझ्यावर किती रागावलात आणि आता माझ्या जेवणाची किती कळकळ करता. इतकी माया माझ्यावर करणारे तुमच्या शिवाय कोण आहे? असा विचार मनात येऊन मला रडू आले." बाबा म्हणाले, "जा, जेवून ये. मला लई भूक लागली आहे." पुरंदरे म्हणाले. "मी नाही जात. मी गेलो व मागे हे तुम्ही मोडलेत तर सर्व मेहनत फुकट जाईल, बाबा काकांना बोलले, "अरे, मी काय हैवान आहे का? काका, आपल्या मांडीवर आपल्या पोराने घाण केली तर मांडी पोर कापून टाकतात का रे?" नंतर पुरंदऱ्यास "तू जा, मी काही मोडणार नाही." पुरंदरे गेले व जेवून आले. संध्याकाळपर्यंत त्यांनी खोली पूर्ण केली व आत पालखी ठेवली. नंतर ते बाबांच्या पाया पडले व म्हणाले, "बाबा, माझी रजा संपली. उद्या निघाले पाहिजे. सगळे काम झाले आहे. फक्त कवाड करावयाचे आहे. ते तात्या पाटील करणार आहेत." बाबा म्हणाले, "उद्याचे उद्या पाहू, जा आता विश्रांती घे." दुसरे दिवशी पुरंदरे परवानगी

मागण्यास आले. बाबा म्हणाले बरं. त्यांनी उदी दिली. पुरंदरे पायऱ्या उतरून खाली आले तोच बाबांनी हाक मारली भाऊ इकडे ये. पुरंदरे परत फिरले. बाबा म्हणाले "घाई कशाला. दुपारी जा." दुपारी पुन्हा तयारीनिशी पुरंदरे परवानगी मागण्यास आले. बाबा म्हणाले, "जाऊन काय करतोस, ते कवाड पूर्ण कर, मग जा, आपण कशाला दुसऱ्यावर टाकावे, आपले काम आपण करावे, वरचेवर यावे; वरचेवर जावे." पुरंदरे म्हणाले, "बाबा आपण आणाल तेव्हा येऊ. घालवाल तेव्हा जाऊ." बाबा म्हणाले "मी तर आणतोच, पण माणसे कुठे धड आहेत. जा, काम पूर्ण कर. सकाळी काकडा झाल्यावर आपण जावें." पुरंदरेने काम पूर्ण केले. दुसऱ्या दिवशी निरोप देताना बाबा म्हणाले, "एक दिवसानी ये, बरं का." [ हट्टी, निष्ठेने निःस्वार्थी गुरुसेवा करून बाबांचे अंतःकरण जिंकणारे असे हे एकच एक बाबांचे भक्त असावेत असे वाटते. ]

★

महोदय,

## श्रीसाईअमृतानुभव ग्रंथ

आपण महान श्रीसाईभक्त आहात म्हणूनच मी आपणास मुद्दाम पत्र पाठवून आपल्या माहितीसाठी कळवीत आहे की मी "श्रीसाईअमृतानुभव" नावाचा मराठी भाषेत ग्रंथ लिहिला आहे. हा ग्रंथ मी श्रीसाईबाबांचे प्रेरणेनेच लिहिला आहे. आणि अशा प्रकारचा ग्रंथ झाला नाही व पुढे होणार नाही असा मला श्रीसाईबाबांचा आशिर्वाद आहे. ह्या ग्रंथात मला झालेला श्रीसाईबाबांचा साक्षात्कार, मला आलेले श्रीसाईबाबांचे हृदयस्पर्शी अनुभव व तसेच आमच्या श्रीसाई केंद्रावर भक्तांना आलेले असे १३२ लोकांचे अनुभव त्यात लिहिले आहेत. पुस्तकास श्रीमंत राणीसाहेब सुमित्रादेवी राजे भोसले सातारा यांची भारदस्त प्रस्तावना आहे. पुस्तक सध्या छपाईचे मार्गावर आहे. पुस्तकाची पाने क्राऊन साईज पाठोपाठ ३०० पर्यंत होतील. पुस्तकाचे मुखपृष्ठावर आकर्षक श्रीसाईबाबांचे शिळेवरील चित्र राहील. तसेच पुस्तकाची किंमत रु. ९ (नऊ रुपये) ठेवली आहे. आपण श्रीसाईभक्त आहांत म्हणून मी आपणास कळवित आहे की, पुस्तक प्रकाशन दिनांक १–१०–७९ रोजी श्रीसाईबाबांचे ६१ व्या पुण्यतिथी दिवशी होईल. पुस्तकाची सध्या आगाऊ नोंदणी चालू आहे. तरी आपणास जेवढ्या प्रती पाहिजे असतील तेवढी रक्कम अधिक टपाल खर्चासह मनीऑर्डरने खालील पत्त्यावर पाठवून द्यावी. पुस्तकाची किंमत रु. ९ + ३ रु. रजिस्टर पोष्ट फी, एकूण १२ रुपये मनीऑर्डरने पाठवावेत ही विनंती. आपले पैसे दिनांक १५–७–७९ पर्यंत पाठवावेत म्हणजे आगाऊ नोंदणी करता येईल. कळावे.

३७७ सोमवार पेठ
मु. पो. सातारा २.

आपला विश्वासू श्री साईभक्त,
**पांडुरंग शंकरराव भुजबळ**

# अनपेक्षित बदल

– सौ. उषा प्र. अधिकारी
सावित्री भुवन बंदर रोड, रत्नागिरी.

● श्रीसाई समाधी मंदिर. रात्रीची वेळ. एक कीर्तनकारबुवा कीर्तन करीत आहेत. पूर्वरंगात श्री दासगणूंच्या बाबांविषयीच्या अध्याय त्रयीवर ते निरुपण करीत आहेत. समाधी मंदिर माणसांनी फुलले आहे. जुलमाचा रामराम म्हणून शिरडीत येऊन खांबाशी टेकून बसलेले भगवंतराव हळूच बाबांच्या मुखाकडे पहात आहेत. पण बाबा त्यांचेकडे रागाने पहात आहेत. ती नजर सहन न होऊन भगवंतराव हळूच स्त्रीयांच्या घोळक्यात बसलेल्या आपल्या पत्नीकडे सुशिलेकडे पहात आहेत. तिच्या डोळ्यातून घळघळा अश्रु येत आहेत पण ते आनंदाचे आहेत. गेल्या कित्येक वर्षात आनंदाने फुललेले तिचे मुखकमल आजच त्यांना दिसत आहे. तिला एवढा आनंद कसला झालाय हे त्यांना कळेना. पुन्हा त्यांनी श्रीबाबांकडे पाहिले. मागलेच दृश्य पुन्हा दिसले. भगवंतरावानी मान वळवली. ते पूर्वरंग ऐकू लागले. बुवा म्हणत होते श्रीबाबांनी नाना चांदोरकरांना जे चार धर्म उपदेश रुपाने सांगितले ते ऐका श्री बाबा म्हणाले, "नाना, ज्या माता पित्यांच्या पोटी आपण जन्म घेतला त्यांचे ऋण कधीही फिटत नाही. सर्व तीर्थे म्हणजे जन्मदाती आई आणि आराध्यदैवत म्हणजे पिता. त्यांना जराही न दुखवता त्यांचे आज्ञेत राहावे. त्यांचा वृद्धापकाळी उत्तम तऱ्हेने सांभाळ करावा. त्यांना शारीरिक व मानसिक कष्ट देऊ नये. इतरांदेखत त्यांचा अपमान करू नये. कठोर शब्दांचा प्रहार करु नये आपण ज्या पदाला पोचलो ते त्यांच्याचमुळे याची जाणीव ठेऊन वागावे. असे वागणाऱ्या माणसाने पुत्र धर्म उत्तम जाणला असे समजावे. यानंतर पतीचा धर्म लग्न होऊन घरी आणलेल्या दुसऱ्याच्या मुलीचाही आदर करावा. तिला प्रेमाने वागावे तिच्या आहारी जाऊ नये. पण आपल्या माहेरच्या सर्व माणसांचा त्याग करून ती आपल्या घरी आली आहे याची जाणीव ठेऊन तिच्यावर माया करावी तिची हौस मौज पुरवावी. प्रत्येक गृहकार्यात तिचा सल्ला घ्यावा. आपली ध्येय धोरणे तिच्यावर लादू नयेत. आता तिसरा धर्म पित्याचा ज्या मुलांना आपण जन्म दिला त्यांचे उत्तम पालन पोषण करावे. त्यांना चांगले शिक्षण द्यावे. त्यांचेसाठी थोडे धन ठेवावे. त्यांचेवर चांगले संस्कार करावे. मात्र मीच त्यांना पोसले शिक्षण दिले असा अभिमान बाळगू नये. मुलींना सुस्थळी द्यावे. कन्याविक्रय करू नये. कर्तव्य आपण करावे, कर्तृत्व ईश्वराला द्यावे. असे केल्याने आपण पित्याचे कर्तव्य बजावले याचा

आनंद होतो. आता राहिला चौथा धर्म. हा सर्वात महत्वाचा माणुसकीचा धर्म. मानवता धर्म. आपल्या दारी आलेल्या याचकाला कधी विन्मुख धाडू नये. जे असेल ते द्यावे. नसेल तर देऊ नये. पण कुणालाही कधीही हडहड करू नये. गरीब विद्यार्थ्यांना मदत करावी. अनाथांच्या संस्थेला मदत द्यावी. अरे आपण देणारे कोण! एक तो अल्लामिया देणारा. याची सदैव आठवण ठेऊन वागावे. हे चारी धर्म उत्तम तऱ्हेने पार पाडणारा मोक्षपदाला पोचतो. बुवा बोलत होते आणि भगवंतराव मनापासून ऐकत होते. ऐकता ऐकता आपल्या थोबाडावर मारून घेत होते. स्वतःलाच विचारीत होते "भगवंता, बोल यातल्या किती धर्मांचे तू पालन केलेस? अरे, ज्या आईबापांनी तुझ्यासाठी आयुष्य वेचले त्यांना कधी प्रेमाने हाक मारलीस का? बाबांनी चौपदरी हाती घेतली नाही एवढेच पण त्यांनी कुठे शिकवणी कर, कुठे जमाखर्च लिही कुठे पेपर टाक असे करून स्वतः अर्ध पोटी राहून अपुऱ्या वस्त्रात राहून तुला उच्च शिक्षण दिले. चांगला पगार असलेली नोकरी तुला मिळाली पण तुला जमीन दिसेनाशी झाली. तू त्यांचा नेहमी अपमान करीस त्यांच्या सावेपणाबद्दल टीका करायचास त्यांना दुःख होई ते मनाने खचले. अंथरूण धरले ते कायमचेच. तू मोठमोठे डॉक्टर आणलेस पण मनाचे रोग औषधाने कसे बरे होणार? एक क्षणभर त्यांचेजवळ बसून प्रेमाने त्यांची विचारपूस केली असतीस अंगावर हात फिरवला असता तर त्यांना किती बरे वाटले असते पण ते तुझ्या हातून झाले नाही. सासरी असलेल्या एकुलत्या एक लेकीसाठी ते आक्रंदत होते पण तू तिची व त्यांची शेवटची भेटही होऊन दिली नाहीस. शेवटी बाबा गेले. आईने टाहो फोडला पण फत्तरा! तुझ्या डोळ्यातून एक आंसूही आला नाही. आईच्या दुःखावर सहानुभूतीची फुंकरही तुला घालता आली नाही. एकुलत्या एक बहिणीला तू बोटभर चिठी पाठवून बाबांच्या मृत्युची बातमी कळवलीस पण आईच्या भेटीसाठी बोलावले नाहीस. आई आतल्या आत झुरत राहिली. थोर अंतःकरणाच्या तुझ्या पत्नीने सासूला दिलासा दिला तिची तरी तू काय किंमत ठेवलीस. अरे, सोन्याच्या पावलांनी ती तुझ्या घरात आली. कपडे, दागिने यांचा वर्षाव तिच्यावर केलास पण कधी प्रेमाने वागलास का? तिला कधी माघारपणाला पाठविलेस का? तिच्या म्हणण्याप्रमाणे वडिलांचे श्राद्ध पक्षसुद्धा केले नाहीस सात्त्विक गुणांची ओतीव पुतली म्हणजे तुझी सुशिला पण तिच्या या गुणांनी तुझ्यासारख्या दुष्ट माणसाला सुद्धा वळविता आले नाही इतका निष्ठूर आहेस तू भगवंता, अरे पुत्र व पतीचा धर्म तुला पाळता आला नाही तो पित्याचा धर्म तरी काय पाळता येणार? सोन्यासारखी गोजिरवाणी दोन मुलं पण लहान पणी त्यांना कधी उचलून घेतलेस का? त्यांचे बरोबर फिरलास का? खेळलास काय? त्यांचे कधी कौतुक केलेस का? फक्त उंची कपडे आणलेस. श्रीमंत

मुलातच वावरले पाहिजेस असे बजावलेस कधी मित्रांना आणून दिले नाहीस कधी त्यांना मित्रांकडे जाऊ दिले नाहीस. तू घरी आलास की मुले काहीतरी निमित्त करून बाहेर निघून जातात. आई अंथरूणावर पडलेली तुला पाहून कूस बदलते. पत्नी सुशिला मुकाट्याने स्वयंपाकघरात जाते. या सगळया गोष्टी काय सांगतात ? अरे तू सर्कशीतला रिंगमास्टर आणि ती जनावरे काय ? भगवंता, हे सर्व झाले पण तू कधी कुणाला उचलून दान दिलेस का? भुकेल्याला अन्न, तहानेल्याला पाणी दिल्याचे तुला आठवते का? एखाद्या अनाथांच्या संस्थेला तू मदत केलीस का ? ऑफिस मधल्या एखाद्या तरी शिपायाशी, कारकुनाशी कधी प्रेमाने वागलास काय ? बोल बोल आपले अंतःकरण तपासून बोल.''

भगवंतराव काय बोलणार ? पश्चातापाने त्यांचे हृदय भरून आले. आसवांच्या सरी ओघळू लागल्या ते धावतच बाबांच्या मूर्तीजवळ गेले आपले मस्तक बाबांच्या पुनीत पायावर ठेवीत म्हणाले, "बाबा, मी चुकलो. मला क्षमा करा. माझ्याकडे असे रागाने पाहू नका. मी नुसता नावाचाच भगवंत. धोंड्याला शेंदूर फासला म्हणून त्याचा देव होत नाही हे मला कळले नाही. मी धोंड्याच्याही लायकीचा नाही. जन्मभर मी सर्वांना कस्पटासमान मानत आलो. दुःख देत आलो. कुणाला प्रेम दिले नाही, सर्वांची उपेक्षा केली. याचे फळ म्हणजे नरकवास. तो मला आता समोर स्पष्ट दिसत आहे. त्यापासून मला सोडवा. बाबा, मीही आपले चुकलेले लेकरू आहे मला पदरात घ्या, पदरात घ्या. भगवंतराव ओक्साबोक्सी रडत होते. अश्रूंचा अभिषेक श्रीबाबांच्या पायावर होत होता. मध्येच त्यांनी मान वर करून बाबांकडे पाहिले. आता तेथे रागाची पुसटशीही छटा नव्हती. ती नजर अति स्नेहाळ होती. भगवंतरावांवर प्रेमाची वृष्टी करीत होती. ते पाहून भगवंतराव अंतरी सुखावले. बाबांच्या परमकोमल चरणांना दृढ आलिंगन देत भावविवशतेने ते ओरडले, "मला बाबांनी आपला म्हटले पूर्वीचा भगवंत मेला. हा नवा भगवन्त आता उदयाला येत आहे आणि आपले नाव तो सार्थ करणार आहे." जवळच सुशिलाबाई येऊन उभ्या राहिल्या होत्या. पतीच्या स्कंधावर हात ठेवून त्या म्हणाल्या. "चलावे आता घरी जायला हवे. सासूबाई आणि मुलं वाट पहातील. भगवन्तराव भानावर येत म्हणाले चल निघू या. पुन्हा एकदा बाबांना वंदन करून दोघे बाहेर आली. साहेब जवळ आलेले पाहून सुलेमान ड्राइव्हरने दार उघडले त्याच्या खांद्यावर थोपटत भगवन्तराव म्हणाले." सुलेमान तू मागे बस. मी गाडी चालवतो. तुला आता विश्रांती. सुलेमान आश्चर्याने पाहू लागला. सुशिलाबाईंनी त्याला बोलू नको अशी खूण केली व त्या गाडीत बसल्या. गाडी सुरु झाली. पुणे केव्हा आले ते कळले नाही घराशी येताच दार धाडकन् उघडून भगवन्तराव पायात बूट तसेच ठेऊन धावतच

आईच्या खोलीत गेला. आपणाला पाहून मुले पळतील या भयाने दोघानाही कवेत घेऊन ते आईच्या कॉटवर बसले तिच्या हडकुळ्या पायावर मृदुपणे बोटे टेकीत ते म्हणाले, "आई, आता तू नक्की बरी होणार. हा प्रसाद घे. मी तुला बाबांची उदी लावतो. अभय, कल्पना तुम्हीही हा प्रसाद घ्या. उदी लावा. अरे, असे बघता काय? आईला बरं वाटलं म्हणजे आपण सगळीच जाऊ काय सुंदर ठिकाण आहे ते! आता लेको आपण मजा करू या. मी तुमच्याबरोबर फिरायला, नाटक सिनेमाला येईन आपण बॅडमिंटन खेळू. उद्याच जाऊन माझ्या ताईला माघारपणाला आणू. तिला पोचवायला जाऊ तेव्हा तुमच्या आजोळी जाऊ. आता तुम्ही म्हणाल तसा मी वागेन. भगवन्तरावांचे एकेक बोल ऐकून म्हाताऱ्या आजी कॉटवर उठून बसल्या. भगवन्तराव पुढे झाले. त्यांना जवळ घेऊन आपल्या पूर्वीच्या अवखळ आवाजात त्या म्हणाल्या, "मेल्या भग्या, एका दिवसात इतका बदललास तू? अरे कुणी जोडे मारून तुला माणसात आणलं! धन्य त्या शिरडीरायाची. तुम्हा सर्वांसह मला एकदा तिथे गेलच पाहिजे आणि चुकलेल्या लेकराला परत कळपात आणल्याबद्दल त्याचे आभार मानले पाहिजेत. भगवन्तराव आईच्या मांडीवर आपल्या अश्रूंना मुक्तपणे ओघळू देत होते.

०००

## आंतरराष्ट्रीय बालक वर्ष

### श्रीसाईबाबा संस्थान शिरडीची चित्रस्पर्धा

### श्री राधाकृष्णस्वामींचा २०२ रु. चा पुरस्कार

श्रीसाईबाबा संस्थानने आयोजित केलेल्या चित्रस्पर्धेसाठी गट १ व गट २ या दोन्ही गटांना प्रत्येकी १०१ रु. चा पुरस्कार श्री राधाकृष्ण स्वामी अध्यक्ष ऑल इंडिया श्रीसाई समाज बंगलोर यांनी ठेवला आहे. दोन्ही गटात प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या स्पर्धकांना हे बक्षिस दिले जाईल.

एक जागृत देवस्थान

# शिर्डी समाधी मंदिर

– श्री. रमेश डी. चव्हाण
साईनिकेतन, गुजरलेन, नवापूर
मु. पो. ता. नवापूर जि. धुळे,
पिन– ४२५ ४१८

• महाराष्ट्रात जी अनेक देवस्थाने आहेत त्यात कोपरगावजवळील शिर्डीचे साईबाबांचे समाधी मंदिर हे प्रामुख्याने गणले जाते. अगदी अलीकडच्या काळात आपल्या अलौकिक चमत्काराने साऱ्यांना विस्मित करून हजारो भाविक भक्तांचे श्रद्धास्थान बनलेले साईबाबा यांची हकीकत खरोखरच अमृततुल्य आहे.

नदीचे मूळ व ऋषीचे कूळ विचारू नये असे म्हटले जाते अगदी ह्याच उक्तीप्रमाणे साईबाबा कोण ? कुठून आले ? जन्म कोणत्या कुळात झाला वगैरे काही ही माहिती उपलब्ध नाही. त्यांच्या तोंडी नेहमी येणाऱ्या बोलीवरून त्यांचा संबंध मोगलाईशी असावा असे वाटते.

औरंगाबाद जिल्ह्यातील धुपखेड्याचे चांदभाई या गृहस्थाच्या वरातीबरोबर बाबा शिर्डीला आले. वरात शिर्डीत खंडोबाच्या देवळाजवळ उतरली होती. खंडोबाच्या देवळातील पुजारी म्हाळसापती सोनार हे होते. बाबा जेव्हा खंडोबाच्या देवळात गेले तेव्हा म्हाळसापतींनी ' आओ साईबाबा ' अशा शब्दांनी त्यांना संबोधिले; आणि तेव्हापासून साईबाबा नावानेच त्यांना सारे ओळखू लागले. तेव्हापासून बाबा जे शिर्डीत रमले ते थेट समाधी घेईपर्यंत !

शिर्डीचे साईबाबा हे अलौकिक संत होऊन गेले व आजही त्यांच्या चैतन्याचा साक्षात्कार अनुभवास येतो, हयातीत त्यांनी अनेक चमत्कार केलेत व आज समाधीनंतरही अनेकांना चमत्कार दाखवीत आहेत. मात्र बाबांचे चमत्कार म्हणजे गारुड्याचे खेळ नव्हेत तर त्यात भगवद्गीतेतील तत्वज्ञानच भरलेले दिसून येते. चमत्कार दाखविण्याचे कारणाचा दुसरा भाग म्हणजे चमत्काराशिवाय नमस्कार नाही. ते सिद्ध कोटीला पोचलेले संत होते वाटेल ते खाते, कोठेही पडून रहावे व कोठेही संचार करावा अशारितीने रहात.

बाबा एक दिवस चावडीत, एक दिवस द्वारकामाईत रहात. द्वारकामाईत त्यांच्या बैठकीच्या उजव्या बाजूला त्यांनी एक अरुंदफळी फाटक्या तुटक्या चिंध्यांनी आढ्या

ला बांधून ठेवली होती. रात्री ते त्या फळीवर झोपत पण त्या फळीवर चढताना किंवा उतरताना कुणालाच दिसत नसत. बाबांनी आपल्या निरनिराळ्या भक्तांना त्यांच्या इच्छेप्रमाणे दर्शन दिले. बाबांनी सामान्य माणसाच्या मनाच्या ठेवणीचा पूर्णपणे ठाव घेतला होता तद्वतच सुशिक्षितांनाही प्रभावित केले. ते सुद्धा त्यांना पटले होते.

बाबांच्या अलौकिक सामर्थ्याची वार्ता सर्वत्र पसरली त्यात भर म्हणजे जेव्हा स्थानिक व्यापाऱ्यांनी दिव्यांसाठी तेल नाकारले तेव्हा बाबांनी पाण्याने पेटविलेले दिवे रात्रभर जळले अशारितीने बाबांच्या सामर्थ्याची ओळख पटली आणि मग दिवसेदिवस दर्शनास गर्दी वाढू लागली.

श्रीसाईबाबांनी आपल्या वास्तव्याने शिर्डीचा सर्व परिसर पवित्र, प्रसन्न, समृद्ध व वैभवशाली बनविला. बाबांनी गरीब श्रीमंत यांना जवळ केले तद्वतच सर्व धर्मांच्या व पंथाच्या लोकांनाही जवळ केले. बाबा आपल्या भक्तांना सांगत—

"परमेश्वर सगळ्या चराचरांमध्ये भरून उरलेला आहे. त्याच्या इच्छेनुसार जगाचे सर्व व्यवहार चालतात. त्याची लीला अगाध आहे. तो ठेवील तसे रहावे. सद्सदविवेक बुद्धी जागृत ठेवावी. सत्याचे पालन करावे. सचोटीने वागावे. आपापले कर्तव्य करीत रहावे. कुणाची निंदा अथवा कुणाशी भांडण करू नये. रिकामटेकडे बसू नये. ईश्वराचा नामजप करीत रहावे. इ. इ."

बाबा यासाठी जन्मभर झटले व जगाला अमर संदेश देऊन गेले.

ज्यावेळी मानवी प्रयत्न संपतात व आशेला जागाच रहात नाही अशावेळी बाबांची प्रार्थना केल्याने, उदी लावल्याने अशक्यप्राय गोष्टी शक्य झाल्याचे प्रत्ययाय येते कारण बाबा स्मरण केल्याबरोबर उपस्थित होतात.

अशाश्वत जगात सुखापेक्षा दुःख अधिक तेव्हा साहजिकच मनःशांतीसाठी माणूस शिर्डी मंदिराकडे धाव घेतो. शिर्डीची वाढती गर्दी ही त्याची साक्षच आहे. समाधीस्थान हे एक जागृत देवस्थान आहे. हजारो लोकांना त्याची प्रचिती येत आहे म्हणूनच देशाच्या कानाकोपऱ्यातून दर्शनासाठी भक्तांची रीघ लागलेली आहे. समाधीपुढे डोकं टेकल्यावर आपल्या दुःखाचा भार हलका झाल्याचे समाधान मिळते. समाधान या शब्दावरून माझाच एक शेर आठवतो तो असा—

"खरंच बाबा तुझ्या मंदिरात...
जर काही समाधान नसते !
पुन्हा...पुन्हा असे शिर्डीकडे
आमचे मन वळले नसते !!"

बाबांनी १९१८ साली विजयादशमीस देहत्याग केल्यावर त्यांचा पार्थिव देह येथेच आहे. संगमरवरी प्रस्तराच्छादित समाधीच्या मागेच बाबांचा पुतळा आहे. या पुतळ्याचे सर्वच शिल्प अगदी रेखीव व प्रमाणबद्ध आहे. या नयन मनोहर मूर्तीकडे पाहिल्यावर एक आगळाच आनंद लाभतो. असा पुतळा इतरत्र कुठेच नाही. तुम्ही कुठेही जा परंतु समाधीमंदिरातील बाबांना पाहून असे वाटते की बाबा आपल्याचकडे पाहात आहेत व समाधीमंदिरातून पायच निघत नाहीत यावरून पुन्हा शेर आठवतो तो असा—

" गावामागून गावे फिरलो
मन कुठेच रमत नाही
पण—
समाधी मंदिरात बाबांना पाहून
शिर्डीतून पायच निघत नाही ! "

असे हे समाधी मंदिर एक जागृत देवस्थान आहे शेवटी आपणास एवढेच सांगावेसे वाटते की, साईबाबांवर अनन्यभावे श्रद्धा ठेवून त्यांना शरण जा म्हणजे बाबा तुमच्या पाठीशी सदैव उभे राहतील कारण—

"जीवन म्हणजे कागदी नाव
केव्हा बुडून जाईल प्राण...!
भवसागरात तरण्यासाठी
साईच आहेत एकमेव ठिकाण !

श्री साईबाबांना माझे शतशः प्रणाम !

* * *

# श्री. द. शं. टिपणीस श्रीसाईचरणी विलीन



श्री. द. शं. टिपणीस

ठाण्याचे एकनिष्ठ साईभक्त, श्रीसाईलीला मासिकाचे एक जुने आधारस्तंभ लेखक व आमचे परमस्नेही गुरुवर्य श्री. दत्तात्रय शंकर टिपणीस यांचे २५ मे ७९ रोजी रात्री १०–३० वा. ह्यांच्या निवासस्थानी वृद्धापकाळामुळे निधन झाले. श्री. टिपणीस गुरुजी १९७८ साली सहकुटुंब श्रीसाईलीला मासिकाच्या चतुर्थ लेखक–कवी स्नेहसंमेलनास शिरडीस हजर होते; व त्यावेळी त्यांनी मासिकाच्या दृष्टीने काही उपयुक्त सूचना केल्या होत्या. श्रीसाईलीलेत आजवर त्यांनी १२५ वर लेख लिहून एक विक्रमच केला आहे. "श्री स्वामी विवेकानंद व शिरडीचे श्रीसाईबाबा" हा त्यांचा फेब्रुवारी १९६० साली लीलेत प्रसिद्ध झालेला पहिला लेख होय. त्यावेळी श्री. द. पां. खांबेटे श्रीसाईलीलेचे संपादक होते.

श्री. टिपणीस यांचा जन्म २३–१२–१९०३ रोजी मुरबाड जवळील टोकावडे गावी झाला. त्यांचे प्रा. शिक्षण पुण्यास व दु. शिक्षण ठाण्यास झाले. १९२३ साली मॅट्रीक उत्तीर्ण झाल्यावर त्यांनी परळच्या आर. एम्. भट हायस्कुलात १९२६ त सहाय्यक शिक्षकाची नोकरी पत्करली व ती इमाने इतबारे ३६ वर्षे करून ते १९६२ साली सेवानिवृत्त झाले. ते उत्तमपैकी नाटककार होते. मुलांसाठी त्यांनी कितीतरी नाट्यपुस्तके लिहिली.

साईभक्त श्री. टिपणीसांचे घरी श्रीबाबांचे सर्व उत्सव साजरे होत असतात. विशेषतः रामनवमीचा उत्सव त्यांचेकडे प्रतिपदा ते दशमीपर्यंत गेली २२ वर्षे सतत साजरा होत आहे. या काळात असंख्य साईप्रेमी कलाकार त्यांचेकडे येऊन हजेरी लावतात. सुविख्यात गायक श्री. राम मराठे हे तर न चुकता उत्सवकालात त्यांचेकडे हजेरी लावतातच. निधन समयी श्री. टिपणीस यांचे वय ७६ वर्षांचे होते. त्यांचे पश्चात् पत्नी, दोन चिरंजीव, सून, नातू व अगणित मित्रमंडळी असा परिवार आहे. त्यांचा परिचय साईलीला फेब्रुवारी ७६ चे अंकात प्रसिद्ध झाला होता. परळच्या भट हायस्कुलात शिक्षण घेत असताना ते आमचे गुरुजी होते व गेली ३० वर्षे त्यांचे आमचे स्नेहाचे अतूट संबंध होते. गुरुजींच्या निधनाने श्रीसाईलीलाचे एक सुहृद लेखक व आमचे मार्गदर्शक कायमचे दृष्टीआड झाले आहेत. श्रीसाईबाबा संस्थान शिरडी व आम्ही व्यक्तिशः गुरुजींच्या परिवार दुःखात सहभागी आहोत. श्रीसाई मृतात्म्यास चिरसद्गती देवो ही प्रार्थना.

# ❀ जेथे जातो तेथे पाठीराखा ❀

– श्री. स्वामी संजयानंद,
बद्रिनाथ, हिमालय.

● श्रीबाबांच्या सान्निध्याचा आलेला हा अनुभव, या अनुभवावरून बाबा जळी-स्थळी-काष्ठी-पाषाणी सर्व व्यापक आहेत.

१९७२ सालातील डिसेंबर महिना आणि त्यात लक्ष्मणझुला-ऋषीकेश येथील थंडी इतकी कडक असते की, माणूस गारठून जाईल! आम्ही पती-पत्नी त्यावेळी तीन वर्षांपासून साधनेसाठी गुंफेत रहात होतो. त्यामुळे तेथील साधुसंतांच्या बऱ्याच ओळखी झाल्या होत्या. डिसेंबर महिन्यात एका स्वामीबरोबर काही कामानिमित्त आम्हाला 'लेन्सडॉन' येथे जावे लागले. लेन्स डॉन हे शहर हिमालयात समुद्रसपाटी पासून ७ ते ८ हजार फूट उंचीवर आहे. तेथे बाराही महिने थंडी असते. आम्हाला सकाळी जाऊन संध्याकाळपर्यंत परत यावयाचे होते. कारण गुंफेत पत्नी एकटी असल्यामुळे कोणत्याही परिस्थितीत परत येणे भाग होते, आणि ह्या बोलीवरच स्वामीजींच्याबरोबर जाण्यास मी तयार झालो. सकाळी निघण्यापूर्वी मी पत्नीला (सौ. मीरा) सांगितले की, कोणत्याही परिस्थितीत संध्याकाळपर्यंत मी परत येईन. आम्ही भाड्याची टॅक्सी करुन ऋषीकेश वरुन प्रयाण केले.

जाताना हरिद्वार व कोटद्वार येथे काही वेळ थांबल्यामुळे पोहोचावयास थोडा उशीर लागला. व स्वामीजींना ज्या ऑफिसरना भेटावयाचे होते, ते सुद्धा आम्हाला "लेन्स डॉनला न भेटल्यामुळे तेथे पण फार वेळ लागला व निघता निघता संध्याकाळ झाली. मला विचार पडला की, आता पत्नी गुंफेत एकटी असल्याने लवकर पोहोचणे फार अवघड आहे. शेवटी स्वामीजींना सांगितले की, आता निघणे आवश्यक आहे.

शेवटी आम्ही तेथून निघालो व रात्री एकच्या दरम्यान ऋषीकेशला आलो व रामनगरला स्वामीजींच्या शिष्याकडे गेलो. स्वामी म्हणाले, "आता रात्रीचे आश्रमाकडे जाणे कठीण आहे. तेव्हा येथेच आपण मुक्काम करू." मी स्वामींना म्हणालो की, कोणत्याही परिस्थितीत मला जाणे भाग आहे. हे सांगून मी एकटाच रात्रीचा पायी निघालो. कमीत कमी चार मैल चालून गेल्यावर लक्ष्मण झुल्याच्या ठिकाणी जंगलाची घाटी लागली. तेव्हा अचानक मन घाबरले, व माझा पाय पुढेच हलेना. रात्रीची वेळ. कडाक्याची थंडी सगळीकडे स्मशान शांतता दाट धुके पडले होते.

जवळ बॅटरी होती, परंतु धुके पडल्यामुळे बॅटरीचा प्रकाश जास्त दूर जात नव्हता. विचार पडला की, मागे जावे तरी कठीण. पुढे जावे तर पायच उचलेना! शेवटी बाबांची आठवण केली व 'साईराम, साईराम' उच्चार करीत तेथेच उभा राहिलो. कारण पुढे चार मैल अंतर कापावयाचे होते. मन काही मानायला तयार होईना.

तशा अवस्थेत उभा राहून (मला) पाच ते दहा मिनीटे झाली असतील, इतक्यात अचानक कोठून तरी साधूवेषात–एका हातात त्रिशूळ, दुसऱ्या हातात पेटलेला कंदील, सफेत दाढी, उंचापूरा असा एक साधू येऊन समोर उभा राहीला; व मला म्हणाला, "क्यों बेटा! डर गये?" माझ्या तोंडातून अचानक शब्द गेले, "हां बाबा, डर गया हूं।" त्यावर तो म्हणाला, "कोई बात नहीं! हम तुम्हे पहुंचायेंगे, चलो चलते हैं।" असे म्हणून तो चालायला लागला. त्याच्या-बरोबर मी सुद्धा निघालो. त्या जंगलातून आम्ही दोघेच वाटचाल करीत होतो. रस्त्यात बाबा म्हणाले, "बेटा, कुछ भजन गाओ।" त्यावर मी भजन म्हणण्यास सुरवात केली व भजन म्हणता म्हणता लक्ष्मणझुला केव्हा आला, लक्षातच आले नाही. इतक्यात बाबा थांबले व म्हणाले, "बेटा, अब तुम जा सकते हो। तुम्हारा ठिकाना नजदिक आया है। हम कल फिर तुम्हारे गुँफामें आयेंगे।" मग मी उद्गारलो, "ठीक है बाबा! अब मुझे कोई डर नहीं। मैं आराम से जा सकता हूं।" इतके बोलून मी एकटाच पुढे जाण्यास निघालो. बाबा लक्ष्मण झुल्यावरच थांबले व तेथूनच हातात कंदील घेऊन मला म्हणाले, "हम यहाँसे कंदील दिखायेंगे, तुम जाव।" मी मागे वळून वळून पहात होतो, तर बाबा तेथेच उभे होते. काही अंतर गेल्यावर मी पाहिले, बाबा अदृश्य झाले होते. मी त्या आनंदात गुंफेवर येऊन पोहोचलो, तो पत्नी माझी वाटच पहात होती. तिला घडलेला प्रकार सांगितला; मी तिला सांगितले की, बाबा उद्या येईन म्हणून बोलले आहेत. नंतर आम्ही बोलत बोलत झोपी गेलो.

दुसऱ्या दिवशी फार वाट पाहिली, पण बाबा काही आले नाहीत. व नंतर तसे दर्शन झाले नाही. त्यावरुन आम्हांला कळून चुकले की, बाबा सर्व ठिकाणी आहेत. फक्त विश्वासाची गरज आहे.

# "कारुण्यमूर्ती श्रीसाईबाबा"

## श्री अवधूतस्वामी महाराज

— प्रेषक : श्री. विनायक गाडगीळ
उर्फ : श्री. सुशीलानंदस्वामी
( श्रीअवधूतस्वामी महाराज पदप्रणित )
आय. आय. टी. पवई, मुंबई.

● भगवान श्री अवधूतस्वामी महाराजांनी लिहिलेले लेख देण्याच्या निमित्ताने संपादकांना भेटण्यासाठी म्हणून मला श्रीसाईनिकेतनला भेट देण्याचा योग आला. तिथे धूप, दीप व पुष्पहारांनी सालंकृत साईमूर्ती अधिकच उजळ दिसत होती. त्या-नंतर संध्याकाळी श्रीमहाराजांकडे सत्संगासाठी भक्तगण जमले असताना मूर्तीबद्दल मी महाराजांना सांगितले.

"पण मूर्तींत विशेष कोणती गोष्ट जाणवली ?" आमच्या श्रीमहाराजांनी विचारले.

● "डोळयांमध्ये कारुण्य दिसले." मोजक्या शब्दात मी उत्तर दिलें. त्यावर श्रीमहाराजांनी खुलासा केला, "अगदी बरोबर आहे तुझे म्हणणे. श्रीसाईबाबांना केवळ ऐहिक जीवनातील सुख प्राप्तीसाठी आळवणी करणाऱ्या अज्ञानी जिवांबद्दल कीव वाटत असे. ह्या लोकांची कामनापूर्ती कितीहि वेळा कृपा प्रसादाने केली तरी त्यातील फारच थोड्यांना परमेश्वर प्राप्तीची, परमार्थाची तळमळ वाटते. हे जाणत असल्यामुळे सतत त्यांच्या दृष्टीत अपार करुणेचा भाव दिसत असला तर नवल नाही !"

कापडाचे मोठे व्यापारी असलेले श्रीमहाराजांचे एक शिष्य त्यावेळी तेथेच बसलेले होते ते सांगू लागले, "मी शिर्डीला नेमाने जाऊन आणि माझ्या रहात्या बंगल्यातहि साईबाबांची मोठी तसबीर ठेऊन सतत त्यांची पूजा करीत असे. पण व्यवहारीक भरभराटीचे जीवन भोगत होतो तरी मी मूर्तीपुढे रोज करुणा भाकित असे की मला आत्मज्ञान देणाऱ्या हयात सद्गुरूची भेट घडवून द्या, माझ्या जीव-भावाच्या सर्व अज्ञानाचे, शंकाचे निरसन करणारे गुरु रूप घेऊन प्रत्यक्षात भेट द्या."

इतर भक्त मंडळी उत्सुकतेने ऐकत होती, यापुढे ते भक्त म्हणाले, अनेक दिवसांच्या विनवणीनंतर मला स्वप्नात दृष्टांत झाला व हसून श्रीसाईनाथ बोलले, बेटा, लवकरच तुझी इच्छा पूर्ण होईल ! आणि महाराज, तुमची भेट कशी माझ्या

भाग्याने घडून आली ते तुम्ही जाणतच आहात! श्री. अवधूत स्वामींच्या म्हणजे आपल्या सद्गुरुच्या चरणावर मस्तक ठेऊन ते भक्त बोलते झाले. तेव्हा त्यांचे सर्व अंतःकरण भरून आले.

भक्तांच्या उद्धारासाठी व त्यासाठी त्यावर स्वधर्माचरण, परमेश्वर भक्ति व आत्मज्ञान देण्यासाठी अवतरलेल्या करूणासागर अवतारी महात्म्यांची ही लीला पाहून आम्ही इतर शिष्याहि नतमस्तक झालो.

---

# उदी–प्रसाद पाठविण्याची नवी पद्धत

श्री साईबाबा संस्थानला देणगी पाठविणारांना दिनांक ३१–१२ ७८ पूर्वी कापडी पिशवीत उदी-प्रसाद व देणगी पावती टाकून त्यांस पत्ता लिहीलेले लेबल लावून पोस्टाने पाठविण्याची पद्धत होती. परंतु या पद्धतीत लेबल तुटून, प्रसाद व पावती भक्तांपर्यंत न पोहचता मध्येच गहाळ होत असल्याच्या अनेक तक्रारी आल्यावरून उदी-प्रसाद पाठविण्याचे बाबतीत सुधारणा करून दि. १–१–७९ पासून पाकिटात प्लॅस्टीक पिशवीत उदी व प्रसाद टाकून तो भक्तांना पाठविला जातो. मनिऑर्डर द्वारा रक्कम पाठविणारांना मनिऑर्डरची पोच पावती पोस्टाद्वारा मिळत असल्याने संस्थानची वेगळी देणगी पावती पाठविण्याचे बंद केलेले आहे व सदरची रक्कम इकडे हिशेबात घेतलेबद्दलचा नंबर मनिऑर्डरचे पावतीवर व उदी-प्रसादाचे पाकिटावर स्टॅम्पींग मशिनने दिला जातो व भक्तांच्या इच्छेप्रमाणे रक्कम ज्या त्या कारणासाठीं जमा करण्याची दक्षता घेतली जाते.

साईभक्त याबाबत सहकार्य करतील अशी आशा आहे.

**क. हि. काकरे**
कोर्ट रिसीव्हर,
श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी.

# श्रीसाईबाबांचा गुरुमार्ग

– श्री. चकोर आजगांवकर
वाय ११/१६९ सरकारी वसाहत
वांद्रे ( पूर्व ) मुंबई ४०००५१

● श्रीसाईबाबांच्या शिकवणुकीमध्ये साधकासाठी कोणता संदेश होता ? कोणता गुरुमार्ग बाबांनी भक्तांना सांगितला होता, याचे साईभक्तांनी चिंतन केले तर त्यांना आठवेल की बाबा म्हणत असत, " **तू मजकडे, पहा मी तुझ्याकडे पाहीन** " " **गुरुपदी श्रद्धा ठेव व जगात सबुरीने वाग** ", " **नेकीने वागावे** " इ. इ. परंतु श्रीबाबा प्रत्यक्ष कोणता मार्ग उपदेशीत याचा स्पष्ट आलेख मिळत नाही. उपास तापास देहकष्ट यांना त्याचा विरोध असे. नामस्मरण करणाऱ्यांना, गीता भागवत गुरुचरित्र पठण करणाऱ्यांना त्यांचा आशीर्वाद असे तसेच हठयोग आचरावयास त्यांची अनुकूलता नसे ! गीतेत भगवंतानी जसे आत्मविश्वासाने सांगितले तसेच ते भक्ताना सांगत की " **तुम्ही मजवर निष्ठा ठेवा, मजकडे पहा माझ्यामध्ये मन प्राण बुद्धीसह बुडा मी तुम्हाला उद्धारीन, मी तुमचा सारा कष्टभार उचलीन. मी तुम्हाला भवाच्या पैलपार नेईन** " परंतु त्यांच्या शिकवणुकीतील हा गूढ सुप्रार्थ नीट चिंतन केल्यावाचून हाती येत नाही. याचे कारण बाबा मिताक्षरी पण सूचक वाणीने बोलत. आपल्याकडे सारे व्यावहारिक अडचणीसाठी येतात. माझ्या सरकारचे धन गाड्यागाड्यानी भरलेले आहे ते कुणीच मागत नाहीत अशी व्यथा ते बऱ्याच वेळा प्रगट करीत बहुधा असे संपूर्ण मुमूक्षू साधक बाबापाशी क्वचितच आल्याने साधनामार्गावरील त्यांचे स्पष्ट बोल प्रयत्नपूर्वक व जाणीवीते कुणी ग्रथित केले नसावेत अण्णासाहेत दाभोळकरांनी मात्र " साईसच्चरित्रात " गुरु महात्म्य व गुरुकृपेची थोरवी विस्ताराने वर्णिली आहे, तेवढ्यावरुनच आपण काही निष्कर्ष काढू शकतो.

● माझ्या मनात हे चिंतन चालू असता एके रात्री बाबा स्वप्नात आले व दर्शन देऊन मागे फिरले. मी म्हटले, " बाबा पुन्हा केव्हा येणार ? ते नुसते हसले व ( **गीता १२** ) अशी एक पाटी मला दाखविली व अंतर्धान पावले, या स्वप्न दृष्टांताचा अर्थ मला लागत नाही, पण एका वैशाखी पौर्णिमेस त्यांनी मजकडून काही लेखन करवून घेतले. गुरुगीता माझ्या हाती आली होती. ती संपूर्ण मंत्रमय असून पूर्वी गुरुचरित्राचीच ती एक भाग होती. परंतु कर्मठांनी ती गुरुचरित्रातून नंतरच्या शतकात वगळली. पुन्हा अण्णासाहेब कामतांनी ती प्रयत्न पूर्वक संशोधून आपण

संपादिलेल्या गुरुचरित्र प्रतीत समाविष्ट करून गुरुभक्तांसाठी उपलब्ध करून दिली. मी त्या वैशाखी पौर्णिमेस गुरुगीतेचे समश्लोकी रूपांतर केले. श्लोकसंख्या मोजली ती बरोबर ५२ भरली. मला वाटले की पूर्वीच्या स्वप्नदृष्टांताशीच याचा काही संबंध दिसतो. त्याच रात्रौ बाबांचे पुन्हा स्वप्नदर्शन घडले व त्यांनी मस्तकी हात ठेवला मीं "**श्रीगुरुदेवदत्त**" असा जयघोष बाबांच्या समोर केला पहातो तो बाबांच्या जागी षडभुज दत्ताकृती उभी आहे. मी जागा झालो. गुरुगीता हाच बाबांचा संदेश आहे. याची मला स्पष्ट अशी प्रचीति आली.

● मी गुरुगीतेवर चिंतन करू लागलो. कारण हाच बाबांचा गुरुमार्ग होता. गुरुसंदेश होता व तोमज सारख्या साईभक्तांनी हृदयात साठवण्याचा होता, गुरुगीत म्हणते "**दान, यात्रा, जप, तप, योग, याग ही सारी प्राथमिक साधना आहे. गुरुकृपेवाचून हे सारे व्यर्थ व भ्रमाल कारण मात्र होते. जेव्हा सद्गुरु भेटतात आपल्या दृष्टी, वेध किंवा स्पर्शाने शिष्यावर कृपाकरून त्याची अंतर्हित शक्ती जागी करतात, ज्योतीने ज्योत पेटवतात; त्याच्या प्राणमताचा लय करून त्याला समाधी स्थितीचा लाभ घडवतात. तेव्हाच शिष्य कृतार्थ होतो.**" हेच शिवाने पार्वतीस सांगितले. हेच मच्छिंद्र-नाथाने गुप्तज्ञान चोरून ऐकले. याच गुरुशिष्य कृपापरंपरेतून नाथपंथाची उभारणी झाली. ज्ञानेश्वरापासून बाबापर्यंत सर्व संतानी हीच कृपायोगाची वरसात महाराष्ट्राद्वारे अखंड भारतात व साऱ्या विश्वात करविली. गुरुगीतेच्या शब्दात म्हणू या--

**"ध्यानमूलं गुरोरूपं। पूजा मूलं गुरु पदम।"**
**मंत्रमूलं गुरुर्वाक्यं। मोक्षमूलं गुरुकृपा॥ (गुरुगीता)**

# ❀ बाबांचे फोटो ❀

[ खुद्द बाबांचा फोटो घेण्याचा तीन वेळा प्रयत्न केला झाला व त्यातला कोणता किती यशस्वी झाला ? ]

## १. भिंती पाडा

काही तरुण मंडळी बाबांचा फोटो घेण्यासाठी म्हणून शिरडीस आली. बाबांची परवानगी मिळावी म्हणून त्यांनी माधवरावांकडे वशिला लावला. माधवरावांनी फोटोग्राफरला लेंडीच्या रस्त्यावर उभे केले. बाबा आल्यावर माधवरावांनी फोटोबद्दल त्यांना विनंती केली. " अरे माझा फोटोबिटो काही नको. भिंत पाडा. " असं म्हणून बाबा पुढे निघून गेले.

## २. तुझा गुरू व मी एकच

बाबा फोटो घेऊ देत नाहीत असं पाहून मुंबईच्या एका फोटोग्राफरने त्यांचा चोरून फोटो घेतला. प्रिंट केल्यावर दिसून आले की चेहऱ्याच्या ठिकाणी त्यांच्या (फोटोग्राफरच्या) गुरूचा चेहरा आला आहे.

[ तुझा गुरू व मी एकच असता माझा फोटो कशाला हवा असं बाबांनी सुचित केलं असावं असं वाटतं. ]

## ३. बाबांच्या पायाचा पुसट फोटो

श्री. माधवरावांनी फारच गळ घातली तेव्हा बाबांनी आपला फोटो घेऊन दिला. बाबा उभे राहिले. त्यांचा सबंध फोटो घेण्यात आला. प्रिंट केल्यावर पहातात तो काय ! बाजूचं सगळं फोटोत आलं होतं. बाबांच्या डोक्यावरील छत्रही आलं होतं. पण शीर्षापासून पायापर्यंतचा भाग आला नाही. फक्त पाय तेवढे आले. बाबांचा म्हणून घेतलेला हा एकच एक फोटो अस्तित्वात असावा असे वाटते. त्याच्या प्रती डॉ. गव्हाणकर यांनी शिर्डीतील १९७७ च्या संमेलनात वाटल्या होत्या. आपला असा फोटो घेऊ देण्यात बाबांचा काय हेतू असावा ते कै. हरिभाऊ दिक्षित यांनी साईलीला व. १, अंक ११ मध्ये दिले आहे. ते असे : — " पाय हे देवाचे अधिष्ठान. आपले लक्ष नेहमी अधिष्ठानावरच केंद्रित व्हावे. कोळयाच्या पायाजवळील मासे कधीच जाळयात सापडत नाहीत, म्हणून आपण नेहमी देवाच्या वा गुरुच्या चरणाजवळ स्थान मागतो. यामुळे मायाजालात आपण सापडत नाही. "

— द. शं. टिपणीस

# शिर्डीवृत्त माहे एप्रिल १९७९

श्री सच्चिदानंद सद्‌गुरु साईनाथ महाराज शिरडी यांचा श्रीरामनवमी उत्सव सालाबाद प्रमाणे ह्या महिन्यात दि. ४-४-७९ ते दि. ६-४-७९ पर्यंत ३ दिवस साजरा झाला. मा. रिसीव्हर श्री. क. हि. काकरेसाहेब यांनी सर्व खाते प्रमुखांची एक महिना अगोदर सभा घेऊन कामाचा व खर्चाचा विचार विनियम करून कामाची योजना आखून दिल्याप्रमाणे मांडवाचे काम पाणपोई, साफसफाई, दिवाबत्ती, लाऊड स्पीकर, कलाकारांची हजेरी संरक्षण व्यवस्था, अन्नदान, वाजंत्री, बॅण्ड, चौघडा वगैरेची व्यवस्था उत्तम प्रकारे ठेवण्यात आली होती.

**उत्सवाचा पहिला दिवस :-** दि. ४-४-७९ बुधवार रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडले. ५-१५ वा. काकड आरती सुरू झाली. ६ वा. श्रींच्या फोटोची व साईसच्चरित ग्रंथाची मिरवणूक समाधी मंदिरातून गुरुस्थान मार्गे द्वारकामाईत गेली. तेथे चांदीच्या भव्य सिंहासनावर श्रींच्या फोटोची स्थापना करून चरित्र वाचनास सुरुवात झाली. त्यानंतर इतर कार्यक्रम सुरू झाले. दुपारी ४-३० ते ६-३० पर्यंत ह. भ. प. श्री. अनंतराव आठवले महाराज यांचे सुश्राव्य कीर्तन झाले. रात्रौ ७-३० ते ९-०० व ९-३० ते ११ पर्यंत ख्यातनाम गायक पंडित भीमसेन जोशी यांचे सुश्राव्य गायनाचा कार्यक्रम झाला. त्यानंतर ९-१५ ते ११-३० पर्यंत श्रींच्या पालखीची मिरवणूक गावातून काढण्यात आली. स्थानिक लोकांनी भारूड-गारूड कार्यक्रम केले. पुण्याचे श्री. रघुनाथ सांडभोर यांनी नकलांचे कार्यक्रम केले. साई-भक्तांनी भजन, नाच, गायन करून कार्यक्रमास शोभा आणली. अशा थाटात पालखी मिरवणूक गावातून चालली असता रस्त्यात ठिकठिकाणी पालखी थांबवून सुवासिनींनी ओवाळणी केली. टाळ, मृदंग, चौघडा, सनई, बॅण्डपथक श्रीसाईनाथ हायस्कूल शिरडी व इतर बॅण्ड पथके, ढोल अशा वाद्यांच्या गजरात पालखी मंदिरात आली व नंतर शेजारती झाली.

**उत्सवाचा मुख्य दिवस :-** दि. ५-४-७९ गुरुवार उत्सवाचा मुख्य दिवस व गुरुवार महत्वाचा दिवस असल्यामुळे श्रीसाईबाबांचे दर्शनासाठी फार गर्दी झाली होती. मंदिर पहाटे ५ वा. उघडले. "श्रीसाईनाथ महाराज की जय" अशा गजरात साईभक्तांनी समाधी मंदिरात प्रवेश केला. नित्य कार्यक्रम झाल्यावर श्रींच्या फोटोची व चरित्र ग्रंथ वाचन समाधि मिरवणूक द्वारकामाईतून समाधि मंदिरात आली.

**कावडी मिरवणूक :-** सालाबाद प्रमाणे गावातील भाविक मंडळी कोपर-गाव येथे गोदावरीचे पाणी आणण्यासाठी आदले दिवशी रात्री गेली. रात्री १ वा.

गोदावरी नदीत स्नान करून ८ मैल पाण्याची कावड घेऊन पायी चालत आली. सकाळी ६-३० वा. मा. रिसीव्हर साहेब यांनी कावडीची पूजा करून स्वागत केल्यावर अंदाजे आठ नऊशे कावडींची भव्य मिरवणूक वाजत गाजत गावातून झाली. मंदिराजवळ मिरवणूक आल्यावर सुवासिनींनी कावडीस ओवाळले. नंतर प्रत्येकाने कावडीच्या पाण्याने बाबांच्या समाधीस स्नान घातले. हा कार्यक्रम दोन तास चालला होता. सकाळी १०-३० ते दुपारी १२-३० पर्यंत ह. भ. प. अनंतराव महाराज आठवले. यांचे रामजन्माच्या आख्यानावर कीर्तन झाले. सायंकाळी निशाणाची व रथाची गावातून मिरवणूक झाली. रात्रौ ९-१५ ते १० पर्यंत गुरूवारची चावडी पालखी कार्यक्रम झाला. रात्रौ १० ते सकाळी ६ वाजे पर्यंत कलाकारांच्या हजेऱ्या झाल्या. रात्रभर जागर झाला. कलाकारांना मानधन म्हणून १ रुपया व नारळ, प्रसाद म्हणून देणेत आला. बाबांच्या दर्शनासाठी मंदिर रात्रभर खुले ठेवले होते. हजारो साईभक्तांनी श्रीसाईबाबांचे दर्शन घेतले.

**उत्सवाचा तिसरा दिवसः**-दि. ६-४-७९ शुक्रवार. नित्य कार्यक्रमा-अतिरिक्त साईबाबांची सामुदायिक अभिषेकपूजा व प्रसाद रूपाने कापडविक्री झाल्यावर ह. भ. प. अनंतराव आठवले महाराज यांचे गोपाळकाला कीर्तन व दहि-हंडी कार्यक्रम सकाळी १०-१५ ते दुपारी १२-३० पर्यंत झाला. रात्री ७-३० ते १० वाजेपर्यंत श्री. नाथराव नेरळकर रेडिओस्टार यांचे सुश्राव्य गायनाचा कार्यक्रम झाला. १० ते १०-३० शेजारती झाल्यावर भक्तांना तीर्थप्रसाद वाटण्यात आलो व रामनवमी उत्सव समाप्त झाला.

ह्या महिन्यात काही कलाकरांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणेः-

**कीर्तनः**-१) श्री. ग. वि. जोशीशास्त्री संस्थान गवई यांची कीर्तने नेहमी-प्रमाणे झाली.

२) ह. भ. प. तुकारामबुवा आजेगावकर, परभणी.

**प्रवचनः**-१) श्री. वसंत स. बावरे (चिंचणीकर), मुंबई

२) ह. भ. प. श्री. निवृत्तीराव ह. पाटील गोंदकर, शिर्डी

**गायन, भजनः**-१) श्री. श्रीराम वि. सातर्डेकर, मुंबई.

**वादन** २) श्री. बाळ भाडे, पुणे.

३) श्री. केशवराव भडगे, पुणे.

४) श्री. साळगांवकर, पुणे. ५) श्री. रामभाऊ दैणठकर, पुणे. ६) श्री. अशोक तुपे, पुणे. ७) पंडीत मुरळी महाराज, मुंबई. ८) श्री. सदाशिवराव हाटकर. ९) श्री. गोविंद ग. पाठक, नाशिक. १०) श्री. उज्वला र. कुलकर्णी. ११) श्री. चेतन सुखटणकर, मुंबई. १२) श्री. भोलानाथ समेळ, मुंबई. १३) श्री. रावसाहेब देशमुख, अमरावती. १४) श्री. शिवराम बिढवे, संगमनेर. १५) श्री. जी. टी. देसाई, मुंबई.

१६) सौ. सविता सु. गिजरे, शिर्डी. १७) श्री. पुणम जैस्वाल, मुंबई. १८) श्री. शशिकांत जोशी, राहाता. १९) श्री. प्रमोद वहाडणे, राहाता. २०) श्री. ज्ञानेश्वर वाबळे, राहाता. २१) श्री. नजिर शेख, राहाता. २२) श्री. समीर शेख, राहाता. २३) श्री. अहमद पठाण, राहाता. २४) श्री. सुभाष सुंदाळे, राहाता. २५) श्री. रामा लोंढे, राहाता. २६) श्री. रा. द. वाडेकर, शिर्डी. २७) श्री. हिरालाल गोपाळ वाडेकर, शिर्डी. २८) श्री. इनुस शेख, राहाता. २९) श्री अनंत दत्तात्रय जोशी. ३०) श्री. भीमराज धोंडीराम बनसोडे ३१) श्री. हाकचंद चंद्रभान रुगनाल. ३२) श्री. नीलम प्रभू, मुंबई. ३३) श्री. आर. एम. पेठकर. ३४) शोभा जोशी, मुंबई. ३५) श्री. प्रभाकर भालचंद्र अवचट, नगर. ३६) श्री. सखाराम राघोजी गुरव. ३७) श्री. सूर्यकांत दत्तात्रय थिटे. ३८) श्री. अशोक जंगम, कोपरगाव. ३९) श्री. विलास चव्हाण, कोपरगाव. ४०) श्री. शिवराम फडागळे, कोपरगाव. ४१) श्री. तुळशीदास फंडागळे, कोपरगाव. ४२) श्री. पुरुषोत्तम विठ्ठल वावकर. ४३) डॉ. श्री. किर्तीकर, मुंबई. ४४) श्री. चोखेलाल धनीराम, रायपूर. ४५) श्री. दत्तात्रय सखाराम जमदाडे. ४६) श्री. धनीराम रंगत, रायपूर. ४७) श्री. रामचंद्र अनंतराव पवार, सातारा. ४८) श्री. ज्ञानोबा तात्याबा वाडेकर, शिर्डी. ४९) ह. भ. प. श्री. बी. बी. जाधव, कोपरगाव. ५०) श्री. श्याम सुंदर भेडा, संगमनेर. ५१) श्री. शिवाजी तुकाराम धुमाळ, शिर्डी. ५२) श्री. गंगाधर जाधव, गंगापूर. ५३) श्री. बाबूराव कांबळे, गंगापूर. ५४) श्री. चैतराम बुवा शिरवळकर, गंगापूर. ५५) श्री. ज्यादूसिंग ठाकूर, गंगापूर. ५६) श्री. बाळा पिलाजी गुरव, शिर्डी. ५७) श्री. मारुती महादू भरोड, संगमनेर. ५८) श्री. जयरामदेव सिताराम चौरासे, बंगळूर. ५९) श्री. शेखनवाब उमर पटेल. ६०) लीलावती कांतीलाल गुजराथी, शिर्डी. ६१) डॉ. सुमतीबाई खानविलकर, लोणावळा. ६२) श्री. वसंत दामोदर रासने, पुणे. ६३) श्री. कोंडिबा किशन, नांदेड. ६४) श्री. गिताराम सेकूजी आनरथे. ६५) श्री. रमाकांत बाबूराव परब. ६६) श्री. रघुनाथराव नागरे, शिर्डी. ६७) श्री. अवधुत रावजी शिंदे व संच, श्रीसाईबाबा संस्थान लेझीम पथक, शिर्डी. ६८) सु. प्र. तुकाराम खेडकर सहपांडुरंग मुळे, मांजरवाडीकर, तमाशा मंडळ, नारायणगाव. ६९) श्री. वसंत जोशी, मुंबई. ७०) श्री. विलास पावस्कर, मुंबई. ७१) श्री. वसंत कामते, मुंबई. ७२) श्री. राजाराम नाचणेकर, मुंबई. ७३) श्री. बन्सल लोबो, मुंबई. ७४) श्री. आत्माराम जाधव, मुंबई. ७५) श्री. सुरेश आजलेकर, मुंबई. ७६) श्री. कदम नारायण, मुंबई. ७७) श्री. चंद्रकांत मोर, मुंबई. ७८) श्री. यशवंत नाईक, मुंबई. ७९) पेंटर श्री प्रकाश काशीनाथ मोरे, शिर्डी. ८०) श्री. रविंद्र कुमार, मुंबई. ८१) श्री. सत्यवान मालाडकर, मुंबई. ८२) श्री. एस. आर. मिराणे, शिर्डी. ८३) श्री. नरेंद्र भास्कर काणेकर, मुंबई. ८४) सौ. अलका जोगळेकर, मुंबई. ८५) श्री. अनंत राणे, मुंबई. ८६) श्री. रघुनाथ नारायण केसकर, नगर. ८७) कु. केदार रघुनाथ केसकर, नगर. ८८) श्री. अनंत

तुकाराम रहाटे, मुंबई. ८९) श्री. वासुदेव मेघश्याम शुक्ल, मुंबई. ९०) सौ. उषा अच्युत सोमण, ठाणे. ९१) श्री. वसंतराव देशपांडे, पुणे. ९२) श्री. सदानंद दत्ताराम पारकर, मुंबई. ९३) श्री. काकासाहेब परब, मुंबई. ९४) श्री. शशीकांत पुसाळकर, मुंबई. ९५) श्री. एजाज खान, मुंबई. ९६) श्री. रामनाथ जनार्दन कोलवालकर, मुंबई. ९७) श्री. गणपत लाडोबा परब, मुंबई. ९८) सौ. माधुरी रामचंद्र लघाटे, मुंबई. ९९) कु. मुक्ताबाई मुरलीधर हाडगे, रांझणी १००) सौ. मुक्ताबाई सोपान काका बारोळे, रांझणी १०१) श्री. सोपान काका बारोळे, रांझणी १०२) श्री. तुकाराम गहिनाजी थोर, रांझणी. १०३) ह. भ. प. श्री रामचंद्र दत्तोबा वाडेकर, शिर्डी. १०४) वे. शा. सं. रामचंद्र शास्त्री सांब शास्त्री जोशी, अमरावती. १०५) सौ. कमला अनंत शेट्ये, मुंबई.

**माननीयांच्या भेटी :-**

१) मा. श्री. एन. एल. अभ्यंकर, रिटायर्ड हायकोर्ट जज्ज, मुंबई.
२) मा. श्री. के. बी. जितकर, आय. ए. एस. जिल्हाधिकारी, अहमदनगर.
३) मा. श्री. बी. एस. मोहीते, डी. एस. पी. अहमदनगर.
४) मा. श्री. आर. जी. गुप्ते, आय. ए. एस. कमिशनर, पुणे.
५) मा. श्री. पी. डी. कसबेकर, आय. ए. एस. सेक्रेटरी, महाराष्ट्र राज्य.
६) मा. श्री. वाय. एस. भावे, आय. ए. एस. चीफ एक्झीक्युटिव्ह ऑफीसर. एम. आय. डी. सी.
७) मा. श्री. सावंत, रीजनल मॅनेजर, स्टेट ट्रान्सपोर्ट, महाराष्ट्र.
८) मा. श्री. जी. व्यंकट स्वामी, लेबर मिनिस्टर, आंध्र प्रदेश, हैद्राबाद.
९) मा. श्री. एम. व्ही. पोंक्षे, ॲडिशनल लेबर कमिशनर, महाराष्ट्र.
१०) मा. श्री. बाकीवाले, ॲसिस्टंट जनरल मॅनेजर, बडोदा बँक, जयपूर.
११) मा. श्री. व्ही. प्रसन्न, प्रॉव्हीडंट कमिशनर, मुंबई.
१२) मा. श्री. आर. डी. देशमुख, डायरेक्टर ऑफ अकाऊंटस ऑफीस, पुणे.
१३) मा. श्री. एम. चन्ना रेड्डी, मुख्यमंत्री, आंध्रप्रदेश. हैद्राबाद.
१४) मा. श्री. एन. भास्कर राव, लॉ, मिनिस्टर, आंध्र प्रदेश, हैद्राबाद.
१५) मा. श्री. राजाराम बापू पाटील, ग्रामीण विकास न्याय विधीमंत्री, महाराष्ट्र.
१६) मा. श्री. बबनराव ढाकणे, राज्यमंत्री सार्वजनिक बांधकाम महाराष्ट्र.
१७) मा. श्री. राजन्, ॲडिशनल जिल्हाधिकारी, नाशिक.
१८) मा. श्री. के. ए. स्वामी, हायकोर्ट जज्ज, बंगलोर, कर्नाटक.
१९) मा. श्री. जी. सी. पाटील, डेप्युटी डायरेक्टर ऑफ लँड रेकार्डस, पुणे.
२०) मा. श्री. अंकोला, असि. कमिशनर ऑफ पोलिस, पुणे.

**हवापाणी:**-शिर्डी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. दिवसा उष्मा भासतो, रात्री हवेत गारवा असतो.

# शिरडी-वृत्त माहे मे, सन १९७९

मे महिन्यात शाळा, कॉलेजांच्या सुटीमुळे श्रींच्या दर्शनासाठी साईभक्तांची गर्दी बरीच होती. संपूर्ण महिना यात्रेच्या स्वरूपात गेला. काही कलाकारांनी श्रींचे पुढे हजेरी दिली ती खाली नमूद केल्याप्रमाणेः—

**कीर्तनः**–१) संस्थान गवई काव्यतीर्थ श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने नेहमीप्रमाणे महत्वाचे दिवशी झाली.

२) सौ. सुशीलाबाई शं. पानसे, बडोदा यांचे कीर्तन झाले.

**प्रवचनः**–ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाघ चौरे, शिर्डी यांचे प्रवचन झाले.

**भजन, गायन, वादन :**–१) सौ. ज्योती ए. मनुजा व फॅमिली मुंबई. २) श्रीमती सुलभा ना. नाईक, बेळगाव. ३) श्रीमती विद्या बी. माखीजा, मुंबई. ४) श्री. स्वामी संजयानंद, व सौ. मीरा संजयानंद बद्रीनाथ. ५) श्री. श्रीराम वि. सातर्डेकर मुंबई. ६) सौ. मीना रेळे, मुंबई. ७) कु. विभावरी द. अंतरकर, वसई, ठाणे. ८) श्री. एम. एन. बच्चा, अहमदनगर. ९) कु. विद्या शिंग्रे, मुंबई. १०) श्रीमती नागरतन, मद्रास. ११) सौ. सुधा म. मंडलकर, भोपाळ. १२) श्री. सीताराम बा. पवार, पुणे. १३) श्री. एम. गोविंदराज, मुंबई.

**हवापाणीः**–शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात उकाडा जाणवला परंतु रात्रीचे वेळी हवेत गारवा होता.

**माननीयांच्या भेटी :—**

१) मा. श्री. जे. नरसिंगराव न्यायाधिश, आंध्रप्रदेश.
२) मा. श्री. एन. के. पारेख, न्यायाधिश, शहर दिवाणी न्यायालय, मुंबई.
३) मा. श्री. बबनरावजी ढाकणे, राज्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम खाते, महाराष्ट्र, अध्यक्ष-महाराष्ट्र जनता पार्टी
४) मा. श्री. जगदीशराव जोशी, IAS, जिल्हाधिकारी, औरंगाबाद.
५) मा. श्री. सक्सेना, अन्न संचालक, नवी दिल्ली.
६) मा. श्री. के. बी. जितकर, IAS, जिल्हाधिकारी, अहमदनगर.
७) मा. श्री. व्ही. के. तोरस्कर, तुरुंग महानिरीक्षक, महाराष्ट्र, मुंबई.
८) मा. श्री. उत्तमराव पाटील, महसूलमंत्री, महाराष्ट्र राज्य.
९) मा. एस. व्ही. नाईक, अतिरिक्त सत्र न्यायाधिश, अहमदनगर.
१०) मा. श्री. लेफ्ट. ज. चोप्रा, विभागीय पुरवठा खाते, दिल्ली.

११) मा. श्री. भटीजा, अवर सचिव, कायदा.
१२) मा. श्री. जे. डी. जाधव, IAS, सहसचिव, सचिवालय, मुंबई.
१३) मा. श्री. नामदेवराव गाडेकर, राज्यमंत्री, आरोग्य, महाराष्ट्र, मुंबई.
१४) मा. श्री. डी. एस. माथूर, IAS, जिल्हाधिकारी, धार, म. प्र.
१५) मा. एम. एस. जोशी, IAS, विभागीय वनाधिकारी, धार, म. प्र.

## वात्सल्यसिंधु साई

वात्सल्यसिंधु साई
तव चरणी जन होती एकरूप
दुःखितांना देतो आधार
तव ध्यान मनोभावे करिती सकलजन...
दुःखात भक्तांसाठी धावुनि येतो
अशा वात्सल्यसिंधु...साईमाऊलीस
मधुकरचे त्रिवार वंदन...!

★ ★ ★

## साईनाम

यह कलीयुगमे सब कहते है।
अणु ॲटम की शक्ती है महान।
किन्तू अणु-ॲटमसेभी बडी शक्ती है "साईनाम" ॥
जो साईनामका जप करले श्रद्धासे।
उसका जीवनका सब बेडा हो जाये आसान।
इसलीये भजो सब एकमुखसे "साईनाम" ॥

—श्री. मधुकर सी मंडलीक
टेलिफोन ऑपरेटर,
सराफगल्ली, नवापूर, जि. धुळे
नवापूर ४२५४१८

# श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

## श्रीसाईबाबांचे चित्र काढा व बक्षिस मिळवा

# आंतरराष्ट्रीय बालक वर्षानिमित्त

## अभिनव चित्रकला स्पर्धा

श्रीसाईबाबा संस्थान शिरडीतर्फे आंतरराष्ट्रीय बालक वर्षानिमित्त एक नाविन्यपूर्ण चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. ही स्पर्धा भारतीय व परदेशांतील सर्व विद्यार्थी मुलामुलींना खुल्ली असून त्यासाठी कोणत्याही प्रकारचे प्रवेश शुल्क नाही. या स्पर्धेचे दोन गट पाडण्यात आले असून चित्रकारांनी पुढील नियम व अटी पाळून आपआपली चित्रे काढावयाची आहेत.

**गट नं. १ : वयोमर्यादा ६ ते ९ वर्षे फक्त :** श्रीसाईबाबांचेच पेन्सीलीने काढलेले कोणत्याही अवस्थेतील चित्र, मग ते आशिर्वादात्मक, पाषाणावर बसलेले, साधे बसलेले, शामा घोड्यासमवेत इ. कोणत्याही अवस्थेतील असो.

**गट नं. २ : वयोमर्यादा १० ते १६ वर्षे :** श्रीसाईबाबांचे गट क्र. १ मध्ये वर्णन केल्याप्रमाणेच कोणत्याही अवस्थेतील पण तीन किंवा चार रंगांनी रंगविलेले चित्र.

**नियम :** १) सर्व चित्रे १० इंच लांब व ८ इंच रुंद अशा पांढऱ्या ड्रॉइंग पेपरवरच चितारलेली असावीत. चित्र काढताना सुयोग्य मर्यादा चारी बाजूंना सोडावी.

२) चित्रकाराने चित्र पाठविताना चित्राच्या वरील बाजूचे उजव्या कोपऱ्यात आपले संपूर्ण नाव, पत्ता, वय, शिकत असलेली इयत्ता, शिक्षण-संस्थेचे नाव इ. सुस्पष्ट लिहावे. तसेच चित्र स्वतः काढलेले असल्याचा आपल्या गुरुजींच्या सहीचा दाखला अवश्य पाठवावा.

३) एका चित्रकारास स्पर्धेसाठी फक्त एकच चित्र पाठविता येईल. चित्रकाराचे पालक श्री साईलीला इंग्रजी किंवा मराठी अंकाचे वर्गणीदार असले पाहिजेत व त्यांनी आपला वर्गणीदार क्रमांक सोबत लिहावा.

४) चित्रे पाठविण्याची अखेरची तारीख **३१ ऑगष्ट १९७९ ही** आहे.

या तारखेनंतर आलेल्या कोणत्याही चित्राचा स्पर्धेसाठी विचार केला जाणार नाही.

५) प्रत्येक गटातील प्रथम, द्वितीय व उत्तेजनार्थ अशी चित्रे निवडली जातील. यशस्वी स्पर्धकांची नावे **श्रीसाईलीला** दिवाळी अंक १९७९ मध्ये जाहीर केली जातील.

६) स्पर्धेसाठी आलेल्या सर्व चित्रांचे प्रदर्शन श्रीसाईबाबा संस्थान शिरडी येथे दिवाळीत भरविले जाईल.

७) यशस्वी चित्रकारांना रीतसर निमंत्रण देऊन त्यांचा जानेवारी १९८० मध्ये भरणाऱ्या **श्रीसाईलीला** लेखक–कवींच्या मेळाव्यात यथोचित सत्कार केला जाईल.

प्रत्येक गटातील प्रथम क्रमांकास रु. ५१, दुसऱ्या क्रमांकास रु. ३१, व उत्तेजनार्थ स्पर्धकास रु. ११ अशी रोख बक्षिसे संमेलन अध्यक्षांचे हस्ते दिली जातील.

८) चित्रे टपालाने किंवा समक्ष पाठवून देण्याचे पत्ते :–

१) मे. कोर्ट रिसीव्हर साहेब, श्रीसाईबाबा संस्थान, मु. पो. शिरडी, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर. (पिन ४२३१०९)

**किंवा**

२) संपादक, श्रीसाईलीला, साई निकेतन,
८०४ बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई–४०० ०१४.

९) चित्रे असलेल्या आवरणांवर "श्रीसाईबाबा चित्र स्पर्धा" असा स्पष्ट उल्लेख करावा.

१०) दोन्ही गटातील प्रथम क्रमांकाची चित्रे श्रीसाईलीला मासिकात यथावकाश छापली जातील.

**श्री क. हि. काकरे**
कोर्ट रिसीव्हर,
**श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी.**

संयोजक
सदानंद चेंदवणकर

श्री साईबाबांच्या सहवासात राहिलेल्या काही व्यक्ति
आजहि आपल्यात आहेत

# 'प्रसाद' मासिकाचा ३३ वा वर्षारंभ व १२ वा दैवत विशेषांक

- ☆ श्री साईबाबांच्या सहवासातील व्यक्तींनी सांगितलेल्या श्री बाबांच्या दुर्मिळ आठवणी.
- ☆ श्री बाबांचा अजूनपर्यंत कोठेहि प्रसिद्ध न झालेला एक दुर्मिळ फोटो या अंकात प्रसिद्ध करीत आहोत.
- ☆ श्री बाबांसंबंधीचे संशोधनपर लेख.
- ☆ शिर्डीचा सचित्र व संपूर्ण परिचय.
- ☆ काही नवीन माहितीसह श्री साईबाबांचे संपूर्ण चरित्र.
- ☆ अनेक संग्राह्य फोटो, श्री साई मंदिरांचे पत्ते इत्यादि वैशिष्ट्यांनी परिपूर्ण.

## श्री साईबाबा विशेषांक

प्रसिद्धी ऑगस्ट १९७९ मध्ये.

पृष्ठे सुमारे १७५ चे वर        किंमत ७ रुपये
पोस्टेज २.५० रुपये

वर्षारंभ व दीपावली विशेषांकासह वार्षिक वर्गणी ३० रुपये.

प्रसाद प्रकाशन
१८९२ सदाशिव, पुणे–३०.

# श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी

## गुरुपौर्णिमा उत्सवाचा कार्यक्रम

स. न. वि. वि.

प्रतिवर्षाप्रमाणे या वर्षीचा श्रीगुरुपौर्णिमा उत्सव दि. ८-७-७९ ते १०-७-७९ अखेर (रविवार ते मंगळवार अखेर) तीन दिवस श्री क्षेत्र शिरडी येथे साजरा होणार आहे. आपले कुटुंबीय व स्नेही मंडळींसह आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

उत्सवातील महत्त्वाचे कार्यक्रम खालील प्रमाणे आयोजित केले आहेत.

दि. ८-७-७९ रविवार.

५-१५ श्रींची काकड आरती.
६-०० श्रींचे फोटोंची व पोथीची मिरवणूक व द्वारकामाईत स्थापना.
६-३० श्री साईचरित्र अखंड पारायण सुरुवात.
६-३० बाबांचे मंगलस्नान व गायनवादन.
८-०० सामुदाईक अभिषेक.
८-०० श्रींच्या वस्त्रांची प्रसाद रूपाने जाहीर लिलावाने विक्री.
१२-०० माध्यान्ह आरती व तीर्थप्रसाद.
४-३० प्रवचन अथवा कीर्तन.
७-०० धूपारती.
७-३० कलाकारांची हजेरी.
९-१५ श्रींचे पालखीची मिरवणूक.
११-०० शेजारती.

दि. ९-७-७९ सोमवार श्री गुरुपौर्णिमा. *

५-१५ श्रींची काकड आरती.
६-०० श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक व श्रीद्वारकामाईतून समाधि मंदिराकडे.

* भक्तांना दर्शनासाठी मंदिर रात्रभर उघडे राहील. *

६–३० श्रींचे मंगलस्नान व गायनवादन.
८–०० श्रींच्या वस्त्रांची प्रसाद रूपाने जाहीर लिलावाने विक्री.
८–०० सामुदाईक अभिषेक.
१२–३० माध्यान्ह आरती व तीर्थप्रसाद.
४–३० कीर्तन.
७–०० धूपारती.
९–१५ श्रींच्या रथाची शिर्डी गावातून मिरवणूक.
१०–०० कलाकारांची हजेरी.

दि. १०–७–७९ मंगळवार

६–०० बाबांचे मंगलस्नान.
७–३० गुरुस्थान येथे रुद्राभिषेक.
८–०० सामुदाईक अभिषेक.
८–०० श्रींच्या वस्त्रांची प्रसाद रूपाने जाहीर लिलावाने विक्री.
११–०० गोपालकाला कीर्तन व दहीहंडी कार्यक्रम.
१२–०० माध्यान्ह आरती व तीर्थप्रसाद.
७–०० धूपारती.
७–३० कलाकारांची हजेरी.
१०–०० शेजारती.

* सोईप्रमाणे कार्यक्रमात फेरबदल करण्यात येईल *

आपला नम्र,
**क. हि. काकरे**
कोर्टरिसिव्हर
**श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी.**

# श्रीसाईबाबा संस्थान शिरडीची प्रकाशने

## श्रीसाईबाबा संस्थान शिरडी यांच्या प्रकाशनांच्या किंमती

| | रु. पै. |
|---|---|
| (१) श्रीसाई सच्चरित्र, (मराठी) | १६-०० |
| (२) श्रीसाई सच्चरित्र, (इंग्रजी) | ६-२५ |
| (३) श्रीसाई सच्चरित्र, (गुजराती) | ६-५० |
| (४) श्रीसाई सच्चरित्र, (हिन्दी) | ७-५० |
| (५) श्रीसाई सच्चरित्र, (कानडी) | ८-०० |
| (६) श्रीसाई सच्चरित्र, (सिंधी) | १०-०० |
| (७) गुजराती पोथी (शरणानंद) | ५-५० |
| (८) श्रीसाईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि, (मराठी) | ०-३० |
| (९) श्रीसाईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि, (गुजराती) | ०-३० |
| (१०) दासगणूकृत ४ अध्याय, (मराठी) | ०-८० |
| (११) सगुणोपासना, (मराठी) | ०-३० |
| (१२) सगुणोपासना, (गुजराती) | ०-२५ |
| (१३) श्रीप्रधानकृत चरित्र, (इंग्रजी) | २-०० |
| (१४) साईलीलामृत, (मराठी) | ५-०० |
| (१५) सचित्र साईबाबा, (चित्रमय संग्रह) | २-०० |
| (१६) साईबाबा अवतारकार्य, (अ. य. धोंड) | ३-०० |
| (१७) शिर्डीचे श्रीसाईबाबा, (के. भ. गव्हाणकर) | ५-०० |
| (१८) शिर्डी दर्शन (६६ चित्रांचा संग्रह) | ४-५० |
| (१९) मुलांचे साईबाबा, (मराठी) | १-२५ |
| (२०) मुलांचे साईबाबा, (गुजराथी) | १-०० |
| (२१) चिल्ड्रेन्स साईबाबा, (इंग्रजी) | १-५० |
| (२२) मुलांचे साईबाबा (तेलगु) | १-५० |
| (२३) बच्चोंके साईबाबा ( हिंदी ) सदानंद चेंदवणकर | १-०० |
| (२४) साई किर्तनमाला, (मराठी) | १-२५ |
| (२५) साई दी सुपरमन, ले. स्वामी साई शरणानंद, (इंग्रजी) | ३-२५ |
| (२६) श्रीसाई रूद्राध्याय, (मराठी) | ०-०५ |
| (२७) श्रीसाई गीतांजली, (मराठी) | ०-०५ |
| (२८) गाईड टु शिर्डी, (इंग्रजी) | ०-१० |
| (२९) श्रीसाईलीला, अधिकृत मासिक मुखपत्र, ( मराठी व इंग्रजी ) वार्षिक वर्गणी, | ६-०० |
| प्रत्येक प्रत | ०-६० |

( व्ही. पी. पद्धत नाही. )